सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १० सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १५७ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सियाचीनमध्ये हिमस्खलन : तीन जवान शहीद !

नवी दिल्ली : लडाखमधील सियाचीन बेस कॅम्पवर झालेल्या हिमस्खलनात तीन भारतीय लष्करी जवान शाहिद झाले आहेत . बचाव पथकाद्वारे शोध मोहीम युद्धपातळीवर सुरु आहे . जगातील सर्वात उंच आणि थंड भागांपैकी एक असलेल्या या युद्धभूमीवर ही धक्कादायक घटना घडली आहे.



नियंत्रण रेषेच्या (डेउ) उत्तरेकडील टोकाशी सुमारे २०,००० फूट उंचीवर असलेले सियाचीन ग्लेशियर त्याच्या धोकादायक भूप्रदेशासाठी आणि खराब हवामान परिस्थितीसाठी ओळखले जाते. या प्रदेशातील तापमान अनेकदा -६० अंश सेल्सिअसपर्यंत घसरते, ज्यामुळे त्या ठिकाणी राहणे आणि लष्करी कारवाया करणे अत्यंत आव्हानात्मक बनते. येथे तैनात असलेल्या सैनिकांना हिमस्खलनाचा वारंवार धोका असतो. सियाचीन ग्लेशियरला त्याच्या अत्यंत उंची आणि प्रतिकूल वातावरणामुळे जगातील सर्वात उंच युद्धभूमी म्हटले जाते. येथील सैनिकांना शत्रूच्या कृतीव्यतिरिक्त अनेक धोक्यांचा सामना करावा लागतो, ज्यात हिमबाधा, हायपोक्सिया आणि हिमस्खलन यांचा समावेश आहे.

# 'नमो शेतकरी योजने'चा सातवा हप्ता मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरित

मुंबई : शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'नमो शेतकरी महासन्मान किसान योजने'चा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण १८९२.६१ कोटी रुपये निधी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होईल.

केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने ही योजना सुरू केली. यामध्ये पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देऊन शेती खर्चाला हातभार लावण्याचा या योजनेचा उद्देश आहे. या सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५



या कालावधीचे अनुदान लाभार्थ्यांना देण्यात आले. ज्या शेतकरी लाभार्थ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समावेश आहे. त्या सर्वांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळाला आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर हे अनुदान शेतक-यांसाठी महत्वाचे ठरणार आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. केंद्र शासनाच्या या अनुदानामध्ये राज्य शासनातर्फे प्रति वर्षी आणखी सहा हजार रुपये अनुदान देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते. या दोन्ही योजनेच्या माध्यमातून लाभार्थी शेतक-यांना प्रति वर्षी बारा हजार रुपये अनुदान मिळत असते. राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेअंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना आतापर्यंत एकूण सहा हप्ते देण्यात आले आहेत. आतापर्यंत सहा हप्त्यामध्ये ९३ लाख ९ हजार शेतकऱ्यांना ११ हजार १३० कोटी रूपयांचे वाटप करण्यात आले आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांना उत्पादन खर्च भागवता यावा आणि शेती टिकाऊ व्हावी यासाठी ही योजना महत्त्वाची ठरत असून या योजनेद्वारे शेतकऱ्यांना प्रतिवर्षी आर्थिक मदत देण्यात येते. आतापर्यंतच्या सहा हप्त्यांमधून राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत रक्कम जमा झाली आहे. सातवा हप्ता वितरित झाल्यानंतर या लाभार्थ्यांची संख्या आणखी वाढणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट होत असल्याचेही भरणे यांनी सांगितले.

# काँग्रेससह विरोधी पक्षांचे उद्या राज्यभर आंदोलन

मुंबई : राज्यातील भारतीय जनता पक्ष युती सरकारने शहरी नक्षलवादाचा बिमोड करण्याच्या नावाखाली आणलेल्या जनसुरक्षा विधेयकाविरोधात विरोध पक्षांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या अत्याचारी विधेयकाविरोधात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)



शिवसेना (उबाठा), माकपा, भाकपा, शेकाप यांच्यासह समविचारी पक्षाने आंदोलनाची हाक दिली असून उद्या बुधवार दिनांक १० सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व तालुका व जिल्हा स्तरावर हे आंदोलन करण्यात येणार आहे. जनसुरक्षा विधेयक हे हुकूमशाही पद्धतीचे असून सरकार विरोधातील आवाज दडपण्यासाठी या विधेयकाचा एका अस्त्रासारखा वापर केला जाण्याची भिती आहे. नक्षलवादाच्या बिमोड करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले कायदे कठोर आहेत, त्यामुळे वेगळ्या कायद्याची गरज नाही पण सरकार अदानी सारख्या भांडलदारांसाठी काम करत असून त्यांच्याविरोधात कोणीही आंदोलन करु नये, आवाज उठवू नये यासाठी हा कायदा वापरला जाऊ शकतो. या कायद्यानुसार कोणालाही अटक करण्याची, जेलमध्ये टाकण्याची तसेच संपत्ती जप्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. हा काळा कायदा हाणून पाडण्यासाठी विरोध पक्षांनी वज्रमूठ केली असून १० सप्टेंबर व त्यानंतर २ ऑक्टोबर रोजी राज्यात आंदोलन केले जाणार आहे, अशी माहिती प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.

# नेपाळमध्ये अस्थिरता वाढली; राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांचा राजीनामा

काठमंडू, ०९ सप्टेंबर : नेपाळमध्ये परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. पंतप्रधान केपी शर्मा ओली यांच्या राजीनाम्यानंतर आता राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनीही आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. सोशल मीडिया ॲप्सवर लावण्यात आलेल्या बंदीविरोधात सुरू झालेल्या निदर्शनांनी हिंसक वळण घेतले असून आतापर्यंत या हिंसाचारात १९ लोकांचा मृत्यू झाला आहे.

नेपाळ सरकारने २६ सोशल मीडिया ऍप्सवर बंदी घातल्याने जनतेत असंतोष पसरला. काल झालेली आंदोलने अधिकच तीव्र झाली असून देशभरात अस्वस्थता आहे. हिंसाचारानंतर सरकारने बंदी उठवण्याचा निर्णय घेतला असला तरी परिस्थिती नियंत्रणात येण्याचे नाव घेत नाही.



प्रदर्शनकर्त्यांनी संसद भवनाला आग लावली असून, माजी पंतप्रधान ओली यांच्या कार्यालयावर हल्ला करण्यात आला. विविध मंत्र्यांच्या कार्यालयांमध्येही तोडफोड आणि आगजनी करण्यात आली आहे. इतकी गंभीर स्थिती झाली की पंतप्रधान ओली यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांच्या घरांनाही आग लावण्यात आली.

स्थानिक मीडियामध्ये आलेल्या छायाचित्रांमध्ये संसद भवनातून धुराचे मोठे लोट उठताना दिसत आहेत. मंगळवारी ओली यांनी राजीनामा दिला. परिस्थिती पाहता अनेक मोठे नेते देश सोडण्याच्या तयारीत असल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, माजी पंतप्रधान झालानाथ खनाल यांच्या पत्नी राज्यलक्ष्मी चित्रकार यांचा मृत्यू झाला आहे. त्यांना त्यांच्या घरी जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना घडली. डलू येथील त्यांच्या निवासस्थानी आंदोलकांनी त्यांना घरात बंद करून नंतर आग लावली, असे सांगितले जात आहे. गंभीर अवस्थेत त्यांना कीर्तिपूर बर्न हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेवर प्रशासनाकडून अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही.

काठमांडू शहरात कर्फ्यू लागू करण्यात आला असून सर्व शाळा बंद करण्यात आल्या आहेत. सोमवारी झालेल्या हिंसेच्या निषेधार्थ लोक पुन्हा रस्त्यावर उतरले आहेत. आता हे आंदोलन केवळ सोशल मीडिया बंदीपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर सरकारी भ्रष्टाचार आणि राजकीय असंतोषाविरोधात जनतेचा राग उफाळून आला आहे.

# ड्रायव्हिंग करताना मोबाईल-हेडफोन वापरल्यास नोकरी जाणार!

पुणे: पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या अलीकडेच झालेल्या बैठकीत प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये बसचालकाला ड्रायव्हिंग करताना मोबाईल-हेडफोन वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच संभाव्य अपघात टाळण्यासाठी झचझचड प्रशासनाने सर्व चालकांना जबाबदारीपूर्वक बस चालवण्याचे आणि नियम काटेकोर पाळण्याचे आवाहन केले आहे.

पीएमपीएमएल बसचे काही चालक हे कानाला हेडफोन लावून बस चालवत असल्याचे अनेक प्रकरण समोर आले आहेत. या नियमभंगामुळे एक अपघातही झाला होता, त्यामुळे यावर रीजनल ट्रान्सपोर्ट ऑफिसर आणि PMPML च्या संचालकांनी अशा चालकांच्या असुरक्षित वर्तनाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. PMPML प्रशासनाने दिलेल्या निर्णयानुसार बस चालकांना त्यांचा मोबाईल फोन कॉन्डक्टरकडे सुपूर्द करावा लागेल, आणि ड्यूटी संपेपर्यंत त्यांना मोबाईल परत मिळणार नाही. तसेच हा नियम पाळला नाही तर अशा चालकांचे त्वरित निलंबन केले जाणार आहे.

# युद्ध हे नेहमीच अनपेक्षित असतं - लष्करप्रमुख जनरल द्विवेदी

नवी दिल्ली , ९ सप्टेंबर : जेव्हा रशिया युद्धात उतरला, तेव्हा आम्ही नेहमीच असा विचार केला होता की हे युद्ध केवळ १० दिवस चालेल. ईराण-इराक युद्ध जवळपास १० वर्षं चाललं. पण जेव्हा ऑपरेशन सिंदूरबाबत गोष्ट आली, तेव्हा आम्हाला कल्पनाही नव्हती की हे किती दिवस चालेल, आणि आपल्यापैकी अनेक लोक म्हणत होते की हे चार दिवसांच्या टेस्ट मॅचसारखं का संपलं? युद्ध हे नेहमीच अनपेक्षित असतं. एखाद्या मुद्द्याचा मानसिक प्रभाव किती असेल, याचा आपण अंदाज लावू शकत नाही, असे विधान करत लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मंगळवारी(दि.९) युद्धांच्या अनपेक्षित स्वरूपावर चर्चा केली आणि आधुनिक युद्ध व लष्करी तयारीचे काही महत्त्वाचे पैलू स्पष्ट केले. जनरल द्विवेदी यांनी युद्ध व लष्करी तयारीच्या तीन प्रमुख पैलूंवर - बल दृश्यीकरण, बल सुरक्षा आणि बल प्रयोग - सविस्तर चर्चा केली. त्यांनी सांगितले, आपण जेव्हा विचार करतो, तेव्हा या तीन मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करतो - बल दृश्यीकरण, बल सुरक्षा , आणि बल प्रयोग.

# पंतप्रधान १७ सप्टेंबरला सुरु करणार एक विशेष मोहीम

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी १७ सप्टेंबर रोजी एका विशेष अभियानाचा शुभारंभ करणार आहेत. हे अभियान संपूर्ण देशात 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान' अंतर्गत राबवले जाणार आहे.

केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आज, सोमवारी एक्सवर माहिती दिली की या अभियानाअंतर्गत ७५,००० आरोग्य शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. ही शिबिरे आयुष्मान आरोग्य मंदिरे, सामुदायिक आरोग्य केंद्रे आणि अन्य आरोग्य सुविधा केंद्रांवर लावली जातील.



नड्डा यांनी सांगितले की, या उपक्रमाचा उद्देश देशभरातील महिला आणि मुलांसाठी आरोग्य सेवा सुधारण्यात आहे, जेणेकरून त्यांना उच्च दर्जाची देखभाल आणि आवश्यक माहिती मिळू शकेल. त्यांनी पुढे सांगितले की, ही शिबिरे विशेषतः महिला आणि मुलांच्या आरोग्यविषयक गरजांवर लक्ष केंद्रित करून तयार करण्यात आली आहेत आणि ही सरकारच्या समावेशक आरोग्यसेवेच्या दृष्टीकोनाला पुढे नेणारी आहेत.

याशिवाय, सर्व आंगणवाड्यांमध्ये 'पोषण महिना' साजरा केला जाईल, जेणेकरून पोषण, आरोग्य जनजागृती आणि एकूणच उत्तम जीवनशैलीला प्रोत्साहन देता येईल.या सर्व उपाययोजनांचा मुख्य उद्देश असा आहे की, देशातील कुटुंबे आणि समुदाय अधिक आरोग्यदायी व सक्षम बनावेत.

आरोग्यमंत्री नड्डा यांनी सर्व खासगी रुग्णालये आणि आरोग्य क्षेत्रातील इतर भागीदारांना आवाहन केले की त्यांनी पुढे येऊन या जनभागीदारी अभियानाचा भाग व्हावे.त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की,'इंडिया फर्स्ट' या भावनेने प्रेरित होऊन, चला आपण सर्वजण मिळून 'विकसित भारत' साठी आपले सामूहिक प्रयत्न अधिक बळकट करूया.

# देशाला नवे उपराष्ट्रपती मिळाले! सी. पी. राधाकृष्णन यांचा दणदणीत विजय



नवी दिल्लीः भारताला नवे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन मिळाले आहेत. उपराष्ट्रपती निवडणुकीत एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी विरोधी उमेदवारावर दणदणीत विजय मिळवला. या विजयामुळे भाजपची सत्ता अधिक मजबूत झाली आहे. या निवडणुकीत सी. पी. राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची तब्बल ४५२ मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांना केवळ ३०० मते मिळाली. या विजयामुळे एनडीएच्या गोटात आनंदाचे वातावरण आहे, तर दुसरीकडे विरोधी पक्षाची मते फुटल्याचे स्पष्ट झाले आहे. राधाकृष्णन यांच्या विजयानंतर त्यांना देशभरातून अभिनंदनाचे संदेश येत आहेत.

# पाऊस-पूर-भूस्खलनाची तिहेरी संकटे; भूस्खलनामुळे रेल्वे वाहतूक ठप्प, २३ गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले

नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून देशातील अनेक राज्यांत मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. दिल्ली, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि उत्तर भारतातील इतर भागांत मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

रस्ते, रेल्वे आणि वाहतूक व्यवस्थेवर याचा मोठा परिणाम झाला आहे. विशेष म्हणजे हरिद्वारमधील बोगद्याजवळ रेल्वे ट्रॅकवर भूस्खलनामुळे प्रचंड ढिगारा पडला होता. या घटनेमुळे रेल्वे वाहतूक तब्बल ११ तास ठप्प झाली. दरम्यान, २३ हून अधिक गाड्यांच्या वेळापत्रकात अडथळे निर्माण झाले असून प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. प्रशासन आणि बचाव पथकांनी घटनास्थळी पोहोचून ढिगारा हटवण्याचे काम हाती घेतले आणि नंतर वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली.



### पंजाबमध्ये पूरस्थिती गंभीर; ५१ मृत्यू, लाखो लोक प्रभावित

उत्तर भारतात मुसळधार पावसामुळे परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. पंजाबमध्ये पुरामुळे मृतांचा आकडा ५१ वर पोहोचला असून, तब्बल ३.८७ लाख लोक प्रभावित झाले आहेत. याशिवाय ४.३४ लाख एकर क्षेत्रातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेत राज्य सरकारने प्रति एकर २०,००० रुपयांची भरपाई जाहीर केली आहे. हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमध्येही जोरदार पावसामुळे अनेक रस्ते बंद आहेत, तर वाहतुकीवर गंभीर परिणाम झाला आहे. श्रद्धाळूंना मोठा धक्का बसला आहे कारण कटरा येथील माता वैष्णोदेवी यात्रा सलग १४व्या दिवशीही स्थगित ठेवावी लागली आहे. दरम्यान, हरिद्वारमधील काली माता मंदिराजवळ भीमगोडा रेल्वे बोगद्याजवळ डोंगरावरून ढिगारा कोसळला. त्यामुळे रेल्वे ट्रॅकवर अडथळा निर्माण झाला. विशेष म्हणजे, एका महिन्यात अशी ही दुसरी घटना नोंदवली गेली आहे, ज्यामुळे रेल्वे सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### हरिद्वार रेल्वे बोगद्याजवळ ढिगारा; २३ गाड्या ठप्प

उत्तराखंडमधील मुसळधार पावसाचा फटका रेल्वे वाहतुकीलाही बसला आहे. हरिद्वारजवळील भीमगोडा रेल्वे बोगद्याजवळ डोंगरावरून ढिगारा पडल्यामुळे डेहरादून-ऋषिकेश आणि हरिद्वारदरम्यान रेल्वे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. या घटनेचा परिणाम २३ गाड्यांवर झाला असून, चंदौसी-ऋषिकेश, हावडा-योगनगरी ऋषिकेश दून एक्सप्रेस, अमृतसर-देहरादून एक्सप्रेस आणि बारमेर-ऋषिकेश एक्सप्रेस यांसारख्या महत्त्वाच्या गाड्या रद्द अथवा विलंबित झाल्या. प्रवाशांच्या गैरसोयीचा विचार करून प्रशासनाने पाच बसेसची व्यवस्था केली आणि प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानी सुरक्षित पोहोचवण्यात आले. तब्बल ११ तासांच्या खंडित सेवेनंतर सोमवारी सायंकाळी पाच वाजता ट्रॅकवरील अडथळा दूर करण्यात आला आणि वाहतूक पुन्हा सुरु झाली.

### मृतांचा आकडा ५१ वर, लाखो एकर पिके उद्ध्वस्त

पंजाबमधील मुसळधार पाऊस आणि पुरामुळे हाहाकार माजला आहे. आतापर्यंत ५१ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे. या पुरामुळे राज्यातील ४.३४ लाख एकर शेती पाण्याखाली गेली असून मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे. विशेषतः बासमती तांदळाच्या निर्यातीवर २५ टक्क्यांपर्यंत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी आतापर्यंत २३,०१५ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे. प्रभावित भागात बचाव आणि मदत कार्य युद्धपातळीवर सुरू असून, प्रशासनाने पीडितांसाठी निवारा आणि अन्नसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

### बचावासाठी ३० हेलिकॉप्टर तैनात

प्रशासनाने सांगितले की १२३ मदत छावण्यांमध्ये सध्या ५,४१६ नागरिक राहत आहेत. पुरामुळे विस्थापित झालेल्या लोकांसाठी या छावण्यांमध्ये निवारा, अन्न आणि आरोग्यसुविधा पुरवल्या जात आहेत. दरम्यान, लष्कराने ३० हेलिकॉप्टर तैनात केली आहेत, ज्यांच्या मदतीने पूरग्रस्त भागात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले जात आहे. तसेच, बीएसएफ, एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या पथकांनी जमिनीवर मदतकार्य हाती घेतले आहे. शेतकऱ्यांसाठी मात्र ही परिस्थिती मोठा धक्का ठरत आहे. प्राथमिक आकडेवारीनुसार, पुरामुळे सुमारे १२ लाख टन तांदळाच्या उत्पादनावर परिणाम होणार आहे. यामध्ये ६ लाख टन बासमती तांदळाचे नुकसान समाविष्ट असून, राज्याच्या निर्यात क्षेत्रालाही मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भक्ती स्थळाच्या विकासासाठी निधी देणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
अहमदपूर येथील भक्ती स्थळ हे सर्व भाविकांसाठी श्रध्देचे केंद्र असून, या ठिकाणाच्या विकासासाठी शासनाच्यावतीने भरीव निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही महाराष्ट्राचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.

राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त भक्ती स्थळी कार्यक्रम झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संत राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज, धारेश्वरकर महाराज, शंकरलिंग शिवाचार्य महाराज, संगमेश्वर महाराज, शिवलिंग शिवाचार्य महाराज, उजना, आचार्य गुरुराज महाराज, शिवा संघटनेचे मनोहरराव धोंडे, चांभरगेकर महाराज, दत्ता खोतरे, निवृत्तीराव कांबळे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे,



माजी नगरसेवक अभय मिरकले, राम नरवटे, श्रीकांत मजगे, विश्वंभर स्वामी यांच्यासह भाविक उपस्थित होते. यावेळी सहकारमंत्री पाटील म्हणाले, राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज हे संपूर्ण देशाचे भूषण होते. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून, अशा थोर संतांचा आशीर्वाद लाभणे हे आपले भाग्य आहे. राष्ट्रसंतांनी समाजहितासाठी कार्य केले, समाज परिवर्तन व प्रबोधन घडवून आणले. मला राज्याचा सहकारमंत्री होण्याची संधीही राष्ट्रसंतांच्या आशीर्वादामुळे मिळाली. राष्ट्राला जोडण्याचे काम संतांनी केले. भक्ती स्थळाच्या विकासासाठी आपण प्रयत्नशील आहोत. यावेळी अनेकांनी उपस्थिती होती.



### संक्षिप्त वृत्त...

## बुधवारपासून शहरातील अतिक्रमणे काढणार मनपा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
लातूर शहरातील सर्व नागरीकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, लातूर शहरातील मुख्य रस्यावर व फुटपाथवर मोठया प्रमाणामध्ये अतिक्रमण झालेले आहे. सदरील अतिक्रमणामुळे मुख्य रस्यावर ट्राफीक वाढत असून रहदारीची समस्या वाढत आहे.

लातूर शहरातील सर्व नागरीकांनी आपले मुख्य रस्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण हे २४ तासांत स्वत: काढुन रस्ता व फुटपाथ हे मोकळे करण्यात यावे. अन्यथा महानगरपालिकेमार्फत नेमण्यात आलेल्या अतिक्रमण पथकामार्फत दि.१०/०९/२०२५ सकाळी ०६.०० वाजल्यापासून सदरील अतिक्रमीत साहित्य जप्त करण्यात येईल व सदर अतिक्रमण निष्कासित करण्यात येईल याची संबधितांनी नोंद घ्यावी असे आवाहन मनपाने केले आहे.

## युवा धोरण समितीत लातूरच्या विधी पळसापुरे यांची वर्णी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
महाराष्ट्र सरकारने राज्याचे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी



समिती गठीत केली असून या समितीत राष्ट्रीय युवा पुरस्कार प्राप्त विशेषतः लातूरच्या कन्या विधी सुभाष पळसापुरे यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड झाली आहे.

विशेष म्हणजे त्या समितीतील सर्वात युवा सदस्य ठरल्या आहेत. राज्यातील युवकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे समाधान, त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक दिशा आणि शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी युवा धोरण महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या समितीचे कार्य अत्यंत जबाबदारीचे असून युवकांच्या भविष्यास दिशा देणारे आहे. बदलत्या काळातील आव्हानांचा विचार करून शिक्षण, रोजगार, क्रीडा, संस्कृती, सामाजिक सहभाग आणि उद्योजकता यांसारख्या विविध क्षेत्रांत युवा धोरणाचा आराखडा तयार करण्याचे काम ही समिती करणार आहे.

## परिवहन महामंडळात ३७ जागांसाठी शिकाऊंची भरती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लातूर विभागात सन २०२५-२६ या सत्रासाठी शिकाऊ उमेदवार (प्रशिक्षणार्थी) म्हणून ३७जागांसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यात यांत्रिक मोटारगाडी (२१ जागा), मोटारगाडी साठा जोडारी (७), ऑटो इलेक्ट्रिकल तथा इलेक्ट्रिशियन (३), सांधाता- वेल्डर (१), रंगकामगार (१६) आणि मेकॅनिक रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनर (२ जागा) या व्यावसायिक पदांचा समावेश आहे. पात्र उमेदवारांनी २० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लातूर विभागीय कार्यालय, जुना रेणापूर नाका, अंबेजोगाई रोड, लातूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे

## आदर्श मैत्री फाउंडेशनकडून शिक्षकांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असलेल्या आदर्श मैत्री फाउंडेशनच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त शहरातील आदर्श शिक्षकांचा सन्मान सोहळा नुकताच पार पडला. या कार्यक्रमाला शिक्षक आमदार विक्रम काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबत प्रा. शिवराज मोटेगावकर आणि उद्योजक तुकाराम पाटील, फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार उपस्थित होते.

आ. विक्रम काळे यांनी शिक्षकांचे महत्त्व सांगताना म्हटले, शिक्षक हे दीपस्तंभासारखे असतात. ते स्वतः जळून विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश देतात. त्यांनी शिक्षकांचे कार्य कुंभारासारखे असल्याचे सांगितले. जो मातीच्या गोळ्याला आकार देऊन सुंदर भांडे तयार करतो, त्याचप्रमाणे शिक्षकही विद्यार्थ्यांना घडवून त्यांना देशाचे जबाबदार नागरिक बनवतात. आदर्श मैत्री फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगून, त्यांनी भविष्यातही या संस्थेच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आश्वासन दिले. या सोहळ्यात प्रा. शिवराज मोटेगावकर, रमेश बिरादार, सुधाकर तोडकर, सच्चिदानंद ढगे यांच्यासह विविध शाळांमधील एकूण ३४ शिक्षकांचा आदर्श शिक्षक म्हणून गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक सौताडेकर यांनी केले, तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्राचार्य सुधाकर तोडकर आणि शुभांगी राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी आदर्श मैत्री फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## लातुरात महिलांसाठी मोफत 'पॅप स्मिअर' तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे लवकर निदान व्हावे म्हणून शहरातील ठाकरे चौकातील ओंकार गणेश मंडळाच्या वतीने डॉ. प्रेरणा काळे यांच्या सहकार्याने महिलांसाठी मोफत 'पॅप स्मिअर' शिबीर घेण्यात आले.

'आरोग्यदायी आई-निरोगी कुटुंब राही' या घोषवाक्याखाली आयोजित शिबिरात मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व इतर ३० महिलांनी सहभाग घेतला. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणारा एक गंभीर आजार आहे आणि 'पॅप स्मिअर' तपासणीद्वारे त्याचे लवकर निदान करणे शक्य होते. या तपासणीचे महत्त्व ओळखून, ओंकार गणेश मंडळाने हे शिबीर घेऊन महिलांत आरोग्यविषयी जागरूकता निर्माण केली आहे. या शिबिराच्या यशस्वितेसाठी काळे हॉस्पिटल व मंडळाच्या महिलांनी पुढाकार घेतला होता.

# अजित पवारांवर कारवाई करा

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
करमाळ्याच्या पोलीस उपाधीक्षक अंजली कृष्णा यांना धमकावल्याप्रकरणी राज्यपालांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी लातूरचे निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यामार्फत राज्यपालांकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आली.



सोलापूरच्या माढा तालुक्यातील कुर्डू येथील मुरुम उत्खननावर धाड टाकण्यासाठी आलेल्या करमाळ्याच्या पोलीस उपाधीक्षक अंजली कृष्णा यांच्याकडून होणारी कारवाई थांबावी, या दृष्टीने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना त्यांच्याच फोनवरून फोन लावून दिल्याचा व्हिडीओ सध्या प्रसारमाध्यमांवर व सोशल मीडियामध्ये व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये अजित पवार हे आयपीएस महिला अधिकारी अंजली कृष्णा यांना दमबाजी करत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे राज्यपालांनी याची दखल घेऊन अजित पवार यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर प्रदेश सचिव मदनराव काळे, जिल्हाध्यक्ष संजय शेटे, युवकचे प्रदेश सरचिटणीस प्रा. प्रशांत घार, महिला जिल्हाध्यक्षा रेखा कदम, युवती जिल्हाध्यक्षा स्नेहा मोठे, तालुकाध्यक्ष बक्तावर बागवान, पुरुषोत्तम पाटील, जाकीर सय्यद, श्रीकांत मगर, उत्तम लोंढे, गोविंद लहुबंदे, सचिन केंद्रे, विक्रांत गायकवाड, हुसेन शेख, शकील शेख, पांडुरंग बेंबडे, चंद्रकांत झुंजे-पाटील, उत्तम सोनवणे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## श्री केशवराज विद्यालयात शिक्षकदिन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
येथील श्री केशवराज विद्यालयात ज्ञानोपासक मंडळांतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी विभागात दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षकदिन कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सहशिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामकिशन सुरवसे, पर्यवेक्षिका श्रीमती अंजली निर्मळे,पर्यवेक्षक राम जोशी, स्थानिक समन्वय समिती सदस्य तथा क्रीडा शिक्षक गुरुनाथ झुंजारे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन व सरस्वतीमाता यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याची महती आणि त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या अतुलनीय योगदानामुळे त्यांचा जन्मदिन भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो असे सांगितले .तसेच जर यशाची शिखरे गाठायची असतील तर मनामध्ये आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी असायला हवी हे विविध उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांना पटवून दिले. सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्व घडवून विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यात अतिउच्च शिखरापर्यंत पोहचवण्याचे काम शिक्षक करतात.

स्वराज्याच्या स्थापनेसाठी शिवरायांना जिजाऊंनी दिलेली शिकवण उदाहरणाद्वारे समजून सांगितली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महेश कस्तुरे यांनी केला.

## डॉल्बी लावणाऱ्या ७७ जणांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
जिल्हाभरात डीजेमुक्त गणेश विसर्जन जिल्हा प्रशासनाने डॉल्बी वाजविण्यास बंदी घातली. तरीही लातूर तालुक्यातील मुरुडमध्ये अनेक गणेश मंडळांनी डॉल्बीचा दणदणाट करीत पोलिसांच्या आवाहनाला फाटा देत, विसर्जन मिरवणुका काढल्या.

आता हा डीजे गणेश मंडळांना चांगलाच भारी उद्योग होत आहे. विविध मंडळांच्या ६० कार्यकर्त्यांसह डॉल्बी मालकांवर तर पोलीस ठाण्यासमोर येऊन गोंधळ घालत डॉल्बी सोडून घेऊन जाणाऱ्या १७ अशा एकूण ७७ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लातूर जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे डॉल्बीमुक्त मिरवणूक काढण्याचे आवाहन केले होते. मात्र मुरुडमध्ये गणेश मंडळांनी डॉल्बी लावूनच विसर्जन मिरवणूक काढण्याचा चंग बांधला होता. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीपूर्वी दोन दिवस अगोदर पोलिसांनी मुरूड पोलीस ठाण्यांतर्गत ९६ गणेश मंडळांना नोटिसा दिल्या होत्या. मात्र त्या नोटिसांना न जुमानल्याने कारवाई करण्यात आली.

## गुन्हेगारांच्या टोळीवर 'मोक्का'

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
शहरातील अंबोजोगाई रोडवरील एका बारमध्ये दारू पिल्यानंतर दारूचे बिल देण्यावरून विधीसंघर्षग्रस्त बालकासह जवळपास २५ गंभीर गुन्हे दाखल असलेल्या सात जणांच्या सराईत गुन्हेगारांनी एका तरुणास रस्त्यावर आणून अर्धनग्न करून बेदम मारहाण केली होती. या आरोपींवर आता मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

आरोपी अजिंक्य निळकंठ मुळे, बालाजी राजेंद्र जगताप, अक्षय माधवराव कांबळे, प्रणव प्रकाश संदिकर, साहिल रशीद पठाण, नितीन शिवदास भालके आणि एक विधिसंघर्षग्रस्त बालक यांनी फिर्यादी अजय बाबासाहेब चिंचोले या तरुणास ११ मार्च २०२५ रोजी सायंकाळी अंबाजोगाई रोडवरील एका बारमध्ये दारूचे बिल दे म्हणून पैशाची मागणी केली. त्यावेळी फिर्यादीने बिल देण्यास नकार दिला असता, आरोपी व विधिसंघर्षग्रस्त बालकाने फिर्यादीस चाकू, लोखंडी कत्ती, लोखंडी रॉड व बियरची बाटलीने मारहाण करून फिर्यादीला अर्धनग्न करून सार्वजनिक रोडवरून फरफटत ओढून खिशातील २२०० रुपये काढून घेतले होते. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल आहे. आरोपी व विधिसंघर्षग्रस्त बालकाचे वडील यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली हत्यारे जप्त करून आरोपींना अटक करण्यात आली.

आरोपींविरुध्द हिंसाचार, आर्थिक लाभासाठी प्राणघातक हत्यारांनी जबर दुखापत करून दरोडा टाकणे, दरोड्याची पूर्व तयारी करणे, जबरी चोरी आदी गंभीर स्वरुपाचे २५ गुन्हे दाखल आहेत. आरोपींविरुध्द नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या परवानगीने महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये कलमवाढ करण्यात आली होती. कलमवाढ केल्यानंतर आरोपींविरुध्द २४०३ पानांचे दोषारोप पत्र लातूरच्या विशेष मोक्का न्यायालय येथे दाखल करण्याची मंजुरी अपर पोलीस महासंचालक (कावसु), मुंबई यांच्याकडून घेण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजित सावंत व समीरसिंह साळवे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर आणि पोलीस उपनिरीक्षक हनुमंत कवले यांनी या प्रकरणाचा तपास केला. त्यांना पोलीस अंमलदार वाजीद चिकले, धैर्यशील मुळे, पांडुरंग सगरे, मोहन सुरवसे यांनी सहाय्य केले.

## हुंडाबळीप्रकरणी पती, सासूला १५ वर्षे सक्तमजुरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
लातूर जिल्हा व सत्र न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालात हुंड्याच्या कारणावरून विवाहितेचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न ठरवत पती व सासूला १५ वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.

जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. आर. भोसले यांच्या न्यायालयात हा खटला चालला. प्रत्येकी २० हजार रुपये दंड, तसेच कौटुंबीक हिंसाचार कायद्यांतर्गत तीन वर्षांची शिक्षा व १५ हजार रुपये ठोठावण्यात आला.



पीडिता कल्पना हिचा विवाह सूर्यकांत जायभाये याच्यासोबत १८ मे २०१३ मध्ये झाला होता. विवाहावेळी पाच लाख रुपये हुंडा देण्याचे ठरले, परंतु प्रत्यक्षात केवळ तीन लाख रुपये व काही दागिने देण्यात आले.

सुरुवातीचे दोन वर्षे संसार सुरळीत चालला. मात्र, नंतर पती सूर्यकांत व सासू राधाबाई यांनी हुंड्याच्या उर्वरित रकमेसाठी कल्पनाचा मानसिक व शारीरिक छळ सुरू केला. २४ फेब्रुवारी २०१७ रोजी कल्पनाला घरातून हाकलून देण्यात आले. तिच्या माहेरच्या मंडळींनी विनंती करून, पीक विकल्यावर उर्वरित हुंडा दिला जाईल, अशी हमी देत तिला सासरी पाठवले.

दरम्यान, ५ मार्च २०१७ रोजी तिचा मृतदेह गावातील विहिरीत आढळला. घटनेनंतर तिच्या वडिलांनी चाकूर पोलिसांत तक्रार दाखल केली. पती, सासू आणि कुटुंबातील इतर सदस्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक संतोष गिते यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय पुरावे व घटनास्थळी केलेला पंचनामा अहवाल यावरून न्यायालयाने हा मृत्यू नैसर्गिक नसून हुंड्याच्या छळामुळे झाल्याचे ठरवत पती सूर्यकांत जायभाये व सासू राधाबाई जायभाये यांना हुंडाबळी अंतर्गत १५ वर्षांचा सश्रम कारावास व प्रत्येकी २० हजार रुपये दंड ठोठावला. या प्रकरणात सहायक सरकारी वकील मीरा कुलकर्णी देवणीकर यांनी न्यायालयात सरकार पक्षाची बाजू मांडली. ॲड. दिग्विजय माकणे, ॲड. ईश्वर वर्मा, ॲड. अभिनय मुंडे, ॲड. प्रसाद शेटे, ॲड. प्रथमेश डोंगरे यांनी सहाय्य केले. चाकूर पोलीस ठाण्याचे चंद्रकांत राजमाले यांनी पैरवी केली.

## प्रॉपर्टीच्या वादातून स्वत:ची मुलेच उठली बापाच्या जीवावर

### न्याय देण्याची केली पत्रपरिषदेत मागणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
मुलांना लहानाचे मोठे केले, त्यांना उच्च शिक्षण दिले. स्वत:च्या पायावर उभे केले. त्यांचे विवाह करुन दिले. यादरम्यान काबाड कष्ट करुन लाखोंची मालमत्ता, शेती कमवली. मात्र उतार वयात मुलांनीच घरा बाहेर काढलेल्या बापाला दारोदारी फिरुन हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगण्याची वेळ आली आहे.

ज्या बापाने लहानाचे मोठे केले त्या बापाला प्रॉपर्टीच्या वादातून मारहाण करण्यापर्यंत मुलांची मजल गेली. यामुळे व्यथित झालेल्या बापाने पोलीस व प्रशासनाकडे दाद मागीतली मात्र न्याय मिळत नसल्याने मुलांनी केलेल्या अन्यायाबाबत आत्माराम धनाजी थेटे यांनी सोमवारी लातूर येथे पत्रकार परिषद घेऊन आपल्याला न्याय द्यावा अशी विनवणी केली आहे.

निलंगा लातूक्यातील तगरखेडा या गावी राहणारे आत्माराम धनाजी थेटे (वय वर्ष ६८) यांनी आपल्या उमेदीच्या काळात अनेक हाल अपेष्टा सहन करत काबाड कष्ट करुन शुन्यातून विश्व निर्माण केले. मुलांना उच्च शिक्षण दिले. त्यांना जिवन जगताना काही त्रास होऊ नये म्हणुन त्यांच्यासाठी पै-पै जमा करत मालमता उभी केली. मात्र हीच मालमत्ता आपल्या जिवावर उठेल असा विचार मनाला कधी शिवला नव्हता. उच्च शिक्षीत मुलांवर भरवसा ठेऊन आपली सगळी मालमत्ता, शेती, सोने चांदी मुलांना देऊन समाधानी जिवन जगण्याचा विचार केला होता. मात्र पत्नी व दोन मुलांनी अनेक वेळा मारहाण करुन जाच सुरु केला. अशी आपबिती आत्माराम धनाजी थेटे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली

उतार वयात मुलांनी सांभाळावे दोन वेळचे जेवण द्यावे अशी अपेक्षा असताना मुलेच आता जिवावर उठली आहेत. मालमत्तेच्या वादातून अनेकदा पत्नी व मुलाकडून मारहान करण्यात आली.

लाखोंची मालमत्ता असताना त्यांना किरायाच्या खोलीत रहावे लागत आहे. अपार्टमेंन्ट व फ्लॅट खरेदीसाठी घेतलेले लाखो रुपयांचे कर्जाचे हप्ते व व्याज देणे बाकी असल्याने दररोज देणेकरी तगादा लावत आहेत. असे आत्माराम थेटे यांनी सांगुन आपल्याला विविध आजार आहेत. किरायाच्या घरात राहत असल्याने व उत्पन्नाचे काहीच साधन नसल्याने दवाखाना करण्यासाठी देखील पैसे नाहीत. त्यामुळे मुलांनी आपली प्रॉपर्टी परत करावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## ग्रंथालय कर्मचाऱ्यांना अनुदानवाढ द्या



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ ऑगस्ट -**
सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेतर्फे ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर करण्यात आले. यावेळी जिल्हाभरातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सदाशिव बेडगे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांतून मागण्यांचे निवेदन शासनाकडे पाठविण्यात आले. राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या ४० टक्के अनुदान वाढीचा शासन निर्णय लवकर निघावा, ग्रंथालयाचे दर्जा, वर्ग बदल करण्यात यावेत, ग्रंथालय अधिनियम १९६७ मध्ये काल सुसंगत सुधारणा करण्यात यावी. ग्रंथालय कर्मचारी यांचे काम सहा तास ऐवजी आठ तास करण्यात यावे. सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचारी यांना शैक्षणिक पात्रतेनुसार वेतनश्रेणी लागू करावी किंवा किमान वेतन दरमहा त्यांच्या खात्यावर जमा करावे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याप्रमाणे शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी यांना सेवाशर्ती नियमावली लागू करणे, ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनात दरवर्षी १० टक्के वाढ करावी, विमा हॉस्पिटलच्या माध्यमातून ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सेवेचा लाभ मिळावा, ग्रंथालय कर्मचाऱ्यांना असंघटित कामगारांचा दर्जा द्यावा आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला पाठविण्यात आले. लातूरचे निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी हे निवेदन स्वीकारले.

यावेळी सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे ज्येष्ठ मार्गदर्शक एल. बी. आवाळे गुरुजी, सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे मराठवाडा विभागाचे उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते, लातूर जिल्हाध्यक्ष श्रीधर स्वामी, उपाध्यक्ष सूर्यकांत जाधव, वैशाली दुरुगकर, सचिव संतोष करमले, सहसचिव नागेश्वरी पांचाळ, गुप्तलिंग स्वामी, कोषाध्यक्ष विद्यासागर गायकवाड, अशोक खोडवे, काशीनाथ बोडके, हणमंत भवाळ, गोविंद पाटील, गिरीधर जंगाले, सोपान सूर्यवंशी, मनीषा भिसे, रेहान सय्यद, मंगल बावगे, माधुरी बावगे, अंजली भोगावकर, ज्योती सावरगावे, सरस्वती कांबळे, ज्योती गस्तगार, रेखा गायकवाड, अनिता लांडगे, कौशल्या तुडमे, सुमित्रा स्वामी आदी उपस्थित होते.

## सौ.सुरेखा भंसाली यांना नारी रत्न पुरस्कार



छत्रपति संभाजीनगर वर्धमान रेसिडेंसी छत्रपति संभाजी नगर द्वारा नारी रत्न पुरस्कार सौ. सुरेखाजी भंसाली यांना प्रदान करण्यांत आला. प्रांतीय अध्यक्षा जैन संस्कार महिला मंचला देऊन सम्मानित करण्यात आले. यावेली वर्धमान रेसीडेंसी चातुर्मास समिती २०२५ चे अध्यक्ष मनोजजी चोपड़ा वर्धमान रेसिडेसी चे अध्यक्ष सुरेशजी ओस्तवाल, कोषाध्यक्ष किशोरजी ललवाणी,मा.उपमहापौर श्री प्रशांतजी देसरड़ा गखडज चे महावीर भंसाली ललवाणी विमलनाथ जैन मंदिर से अध्यक्ष अनिलमामा संचेती ,भोजन प्रमुख श्री निर्मलजी कोठारी,सकल जैन समाज के उपाध्यक्ष संजयजी संचेती संगितकार नरेन्द्रजी गेलड़ा , महावीर जन्म कल्याण का महोत्सव समिति के अध्यक्ष स्वप्निलजी पारख,जितेन्द्रजी कोठारी, संदीप बांठिया, हर्ष भंसाली,सौ चोपड़ा भाभी,सौ. स्मिता कोठारी संघ, पदाधिकारी उपस्थित होते

## त्रेतायुग फांऊडेशनचा डॉ.एस.राधाकृष्णन मेंटर पुरस्कार २०२५ सुभाष गवई यानां जाहीर



बिडकीन दि ९- सप्टेंबर त्रेतायुग फाउंडेशनचा एस राधाकृष्णन मेंटर पुरस्कार श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा ता पैठण.येथील क्रीडा शिक्षक गवई सुभाष विश्वनाथ यांना जाहीर झाला आहे.शिक्षक दिनाच्या औचित्य साधून दि ५ सप्टेंबर रोजी हा पुरस्कार त्रेतायुग फाउंडेशन च्या वतीने सेंट्रल गव्हर्मेंट च्या आधीपत्याखाली दिला जातो. उल्लेखनीय कामगिरी, उत्कृष्ट पंच, उत्कृष्ट समुपदेशन, विद्यार्थ्यांमध्ये सामंजस्याची भावना रूजवण्यासाठी महत्त्वाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांना हा आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार दिला जातो. यासाठी भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ अहमदनगर संचलित संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ धनंजय अशोक मुखेकर, संस्थापकीय सचिव वंदना अशोक मुख्यकर, उपसचिव भाऊसाहेब दहीहंडे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत यासाठी विद्यालयातील कर्डिले ,गायकवाड मॅडम, पठाण मॅडम, सतीश मुख्यकर , प्रशांत शेळके सर, काकासाहेब मालोदे सर, शंकर शिरसाट, बद्री धरपळे, प्राचार्य महेश घोरतळे, प्राध्यापक डॉक्टर अनिल कांबळे, उज्वला कांबळे, यांनी सुद्धा कौतुक केले आहे.

## सणासुदीला ग्राहकांना प्युअर प्राइस ऑफर

छत्रपती संभाजीनगर - भारतातील विश्वासार्ह दागिने ब्रँड आणि १९२ वर्षांची परंपरा लाभलेले पीएनजी ज्वेलर्स पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतीक्षित प्युअर प्राइस ऑफर मोहिमेसह सज्ज झाले आहे. १ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणारी ही योजना आगामी सण व लग्नसराईच्या हंगामात ग्राहकांना सोने खरेदी करताना आर्थिक दिलासा आणि आत्मविश्वास देण्यासाठी खास तयार करण्यात आली आहे. सोन्याच्या किंमतीत सतत होणाऱ्या वाढीचा विचार करून, ही मोहिम ग्राहकांना योग्य समाधान देणारी आहे. या योजनेत ग्राहकांना त्यांच्या आवडीचे सोनं किंवा हीऱ्यांचे दागिने १ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विद्यमान दराने प्री-बुक करण्याची संधी मिळते जर नंतर सोन्याचा दर वाढला, तरीही त्यांना आधीच्या कमी दराचा लाभ मिळतो.

## ऍमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हलची घोषणा

छत्रपती संभाजीनगर - : अमेज़न डॉट इन ने आज घोषणा केली की, ऍमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल २३ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल. प्राइम सदस्यांना खरेदीच्या या उत्सवाची २४ तास आधी विशेष उपलब्धता मिळेल. भारत उत्सव कालावधीसाठी सज्ज होत असताना, ग्राहकांना जलद गतीने उत्तम किमतीत विस्तृत श्रेणीची अपेक्षा करता येईल. स्मार्टफोन, इलेक्ट्रॉनिक्स, फॅशन, सौंदर्य, घरगुती जीवनावश्यक वस्तू, किराणा आणि बऱ्याच लोकप्रिय श्रेणींमध्ये आकर्षक डील, आकर्षक खरेदी अनुभव, एसबीआई क्रेडिट आणि डेबिट कार्ड आणिईएमआई व्यवहारांवर १०% त्वरित सूट, अग्रेसर बँकांकडून आकर्षक ऑफर आणि ऍमेझॉन पे आईसीआईसीआई बँक क्रेडिट कार्डवर अतिरिक्त कॅशबॅकसह, या ऍमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हलमध्ये प्रत्येकासाठी काहीतरी आहे. ऍमेझॉन इंडियाच्या श्रेणी विभागाचे उपाध्यक्ष सौरभ श्रीवास्तव म्हणाले, ऍमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल देशातील सर्वात मोठ्या शॉपिंग सेलिब्रेशनसाठी ग्राहक, विक्रेते आणि ब्रँड यांना एकत्र आणून भारतीय उत्सवांचा उत्साह साजरा करतो.

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा आराखडा सादर

छत्रपती संभाजीनगर : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने २०२३ या आर्थिक वर्षापर्यंत १ लाख कोटींच्या एकूण कर्जपुस्तकाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी आपला धोरणात्मक आराखडा जाहीर केला आहे. २०१७ मध्ये स्मॉल फायनान्स बँक म्हणून कामकाज सुरू झाल्यापासून झालेल्या प्रगतीच्या पायावर हा आराखडा उभा आहे. ठेवींचा भक्कम पाया वाढवणे, कर्जउत्पादनांच्या श्रेणीचा विस्तार करणे आणि खर्च-केंद्रित कार्यपद्धतीद्वारे अधिक शाश्वत नफ्याचा पाया निर्माण करणे यावर या बँकेची वाढ आधारित आहे.विविधतापूर्ण कर्जपुस्तक : 'उज्जीवन'ने आपल्या कर्जांच्या पोर्टफोलिओमध्ये सातत्याने विविधता आणली आहे. सुरक्षित तारणाधारित कर्जांचे प्रमाण वित्त वर्ष २०१९ मध्ये १६ टक्के इतके होते. वित्त वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीअखेर ते ४६ टक्क्यांवर पोहोचले. पुढील टप्प्यात हे प्रमाण ६५ ते ७० टक्क्यांपर्यंत नेण्याचा बँकेचा मानस आहे. यामध्ये परवडणारी गृहनिर्माण कर्जे, सूक्ष्म गहाणकर्जे, सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगांसाठीची कर्जे, वाहनकर्जे, सोनेतरण कर्जे आणि कृषिकर्जे यांचा प्रमुख वाटा असेल.

## हास्यजत्रा - विनोदाचा बोनस' ७ सप्टेंबरपासून सोनी मराठी वाहिनीवर

छत्रपती संभाजीनगर - सोनी मराठी वाहिनीवरच्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमानं महाराष्ट्रातल्याच नाही तर जगभरातल्या प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. या कार्यक्रमाचे अनेक चाहते आहेत ज्यामध्ये अनेक दिग्गज नामवंत कलाकारही सामील आहेत. आता महाराष्ट्राची हास्यजत्रा 'विनोदाचा बोनस' घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. २०१८पासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' आपल्या सोनी मराठी वाहिनीवर अविरत चालू आहे. विषयांचं नावीन्य, आपल्या मातीतला विनोद आणि मराठीमधल्या सर्व लहेजांचा गोडवा जपत हास्यजत्रेनं प्रत्येक वयोगटातल्या प्रेक्षकांना आपलंसं केलं आहे. एकवीसहून अधिक कलाकारांच्या संचानं नऊशेहून अधिक एपिसोड्स आणि सत्तावीसशेहून अधिक स्किट्सचं सादरीकरण करून विनोदी कार्यक्रमांच्या यादीत हास्यजत्रेला वरचं स्थान मिळवून दिलं आहे. प्रत्येक सिझनमध्ये प्रेक्षकांसाठी काहीतरी नवीन घेऊन येण्याचा प्रयत्न महाराष्ट्राची हास्यजत्राच्या संपूर्ण टीमचा असतो.


**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६) २२१७२७, E-mail:-mchhingoli@gmall.com

विभागः- लेखा जा.क्र.नपहि/ १५६१/२०२५-२६ दिनांक ०८/०९/२०२५

**ऑनलाईन ई-निविदा सुचना २०२५-२६**

माझी वसुंधरा ४.० अर्तगत निधीमधुन प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहुन खालील कामासाठी ईपीएफ पंजीकृत अनुभवी नर्सरीधारका सेवाभावी संस्था/कंपनी यांचे मार्फत ई-निविदा मागविण्यात येत असुन सदरील कामासाठी कोऱ्या ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ०९/०९/२०२५ रोजी ११.०० वाजले पासुन ते दिनांक १६/०९/२०२५ रोजी ५.०० वाजे पर्यत उपलब्ध असतील प्राप्त ई-निविदा १८/०९/२०२५ रोजी सांयकाळी ५.०० वाजल्यानंतर गुत्तेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. एक किंवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आलेला आहे. ई-निविदा संबंधीत अटी व शर्ती कार्यालयीन वेळेमध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये पहावयास मिळतील.

मुख्याधिकारी

नगर परिषद, हिंगोली


# एमजीएम विद्यापीठाचा सहावा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा सहावा वर्धापन दिन सोहळा आज विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मुंबई विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ.अजय भामरे हे उपस्थित होते. तसेच यावेळी, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम. जाधव, शिक्षणतज्ञ भाऊसाहेब राजळे, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी, एमजीएम परिवारातील सर्व सदस्य व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

चिंतनगाह परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर या ठिकाणी ध्वजारोहण आणि विद्यापीठ गीतगायन संपन्न झाले.



प्रमुख पाहुण्यांना एनसीसीच्या विद्यार्थ्यांकडून गार्ड ऑफ देण्यात आला.

एमजीएम विद्यापीठाच्या वाटचालीची संपूर्ण माहिती यावेळी माहितीपटाच्या माध्यमातून दाखविण्यात आली. आज मान्यवरांच्या हस्ते 'एमजीएम अभिव्यक्ती २०२५' या न्यूजलेटर, 'शार्ङ्गदेव सरणी' रिसर्च पाथवे इन शास्त्र अँड प्रयोग वॅल्युम - २, 'मीडिया मेसेंजर' बायलिंग्वल रिसर्च जर्नलचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे एमजीएम विद्यापीठ आणि 'डिस्कव्हर लॅब. एआय' यांच्या संयुक्त विद्यमाने 'ट्रेनिंग अँड प्लेसमेंट पोर्टल'चे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

आज झालेल्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात एमजीएम विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यामध्ये मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारावर कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ आणि मुंबई विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ.अजय भामरे यांनी सह्या केल्या.

आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मेधा नाईक व प्रा.सरफराज अली यांनी केले तर आभार उपकुलसचिव डॉ. परमिंदर कौर यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांनी व्यक्त केलेले विचार खालीलप्रमाणे आहेत :

डॉ.अजय भामरे, प्र - कुलगुरू, मुंबई विद्यापीठ : सहा वर्षाच्या आपल्या कालावधीत एमजीएम विद्यापीठाने उत्तुंग कामगिरी केलेली आहे. येणाऱ्या दशकात एमजीएम विद्यापीठ राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले नावलौकिक कमावेल, असा विश्वास मला वाटतो. विद्यार्थी केंद्रित हे विद्यापीठ असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला येथे चालना मिळते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असणारे हे विद्यापीठ असून दर्जेदार आणि परवडणारे शिक्षण येथे उपलब्ध करून दिले जाते.

## ११ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाल रोजगार मेळाव्याचे आयोजन

अहिल्यानगर, दि. ९ : संगमनेर तालुक्यात उमेदवारांना विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर नगरपालिका कला दा.ज. मालपाणी वाणिज्या आणि ब.ना. सारडा विज्ञान (स्वायत्त) महाविद्यालय, संगमनेर येथे पंडित दीनदयाल रोजगार मेळाव्याचे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

एचएससी, सर्व शाखांतील पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा व डिग्रीधारक उमेदवारांनी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर तसेच https://forms.gle/CDMcrNKWzDNp-brL9 या लिंकवर आपली नोंदणी करून पात्रतेनुसार अर्ज करावा.

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४१-२९९५७३५ वर संपर्क साधावा. तसेच रोजगार मेळावा समन्वयक वसीमखान पठाण (९४०९५५५४६५), संतोष वाघ (८८३०२१३९७६), बद्रीनाथ आव्हाड (९४२०७२५२८०) आणि योगेश झांजे (९५८८४०८८९०) यांच्याशीही संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मल्टिपल मायलोमा रुग्णाचे बोन मॅरो ट्रान्सप्लांट यशस्वी

### मुख्यमंत्री सहायता निधीमुळे आधुनिक उपचार अत्यल्प खर्चात उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर : मल्टिपल मायलोमा या गंभीर आजाराने ग्रस्त रुग्णाचे अस्थिमज्जा प्रत्यारोपण (बोन मॅरो ट्रान्सप्लांट) मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वीरीत्या पार पडले. मुख्यमंत्री सहायता निधीच्या सहाय्यामुळे रुग्णाला अत्यल्प खर्चात आधुनिक व अत्याधुनिक सुविधा मिळाल्याची माहिती हेमॅटोलॉजिस्ट व प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. निकेत मंत्री यांनी दिली.



या उपचारात ४.५ दशलक्ष स्टेम सेल्स गोळा करून उच्च-डोस केमोथेरपीनंतर परत इन्फ्युज करण्यात आले. केवळ अकराव्या दिवशी न्यूट्रोफिल एन्ग्राफ्टमेंट साध्य झाले. रुग्णाला अत्यल्प अँटीबायोटिक्सची आवश्यकता भासली व केवळ सौम्य (ग्रेड-१) म्यूकोसिटिस दिसून आला, जो कर्क्युमिनच्या सहाय्याने नियंत्रणात आला.

डॉ. मंत्री यांना आतापर्यंत ०० हून अधिक ऑटोलॉगस, अॅलोजेनिक व हॅपलोआयडेंटिकल प्रत्यारोपणांचा तसेच सात सीएआर-टी थेरपी उपचारांचा अनुभव आहे. हा उपचार आमच्यासाठी स्वप्नवत ठरला, असे रुग्णाच्या कुटुंबीयांनी सांगितले. मुख्यमंत्री निधीमुळे आर्थिक मदत मिळाल्याने व डॉ. मंत्री यांच्या मार्गदर्शनामुळे आमच्या रुग्णाला नवे जीवन मिळाले, असे त्यांनी नमूद केले. हे यशस्वी प्रत्यारोपण मराठवाडा व आसपासच्या रुग्णांसाठी नवी आशा निर्माण करणारे ठरल्याचे डॉ. मंत्री यांनी सांगितले. या वेळी डॉ विशाल कुटे (सेंटर हेड),डॉ निकेत मंत्री, रक्त विकार तज्ञ् ,डॉ आनंद देशमुख, मेडिसिन,कॅप्टन मिश्रा, रिजनल मार्केटिंग हेड आदी उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात शिक्षक दिन व आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन उत्साहात साजरा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ सप्टेंबर

येथील अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिक्षक दिन व आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या विशेष उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या जागी वर्गात जाऊन अध्यापन केले.त्यानंतर विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे स्थान सर्वोच्च आहे, त्यामुळे नेहमीच शिक्षकांविषयी आदराची भावना ठेवावी असे प्रतिपादन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.निलेश गावडे यांनी शिक्षकाचे महत्त्व व आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट केले. त्यानंतर महाविद्यालयातील सर्व गुरुजन व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.आर.के. बारोटे,कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील,डॉ. सुभाष पाटील,एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ.पंकज गावीत, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निलेश गावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.सुनील चौधरे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एनएसएस स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी डॉ. निलेश गावडे,डॉ.पंकज गावीत,डॉ.सुनील चौधरे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कै.बाबुरावजी काळे शाळेत विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव, दि. ८ सप्टेंबर

येथील कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी आणि मार्गदर्शन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या शिबिराचा उद्देश लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये दातांच्या स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.शिबिरात शाळेतील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन आपल्या दातांची तपासणी करून घेतली.



शिबिर प्रसंगी अध्यक्षस्थानी शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा ज्योतीताई रंगनाथ काळे या होत्या.या वेळी श्री गजानन डेंटल क्लीनिकचे संचालक डॉ. चैतन्य कासार व डॉ. पूजा कासार आणि त्यांची अनुभवी टीम उपस्थित होती.शाळेचे मुख्याध्यापक निलेश पाटील, संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, तसेच गावातील श्री रवींद्र काळे,शहराध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे रवींद्र काळे, तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी राजेंद्र काळे,चंद्रकांत काळे,अजय नेरपगार,श्रीकृष्ण पाटील, समाजसेवक दत्तू रोकडे,गणेश पाटील,समाज प्रबोधनकार विष्णू मापारी, आरोग्य दूत तथा समाजभूषण दिगंबर वाघ,प्रा.कमलेश काळे,प्रा.अनिल मानकर,योगेश काळे,संदीप निकम,सागर घाटे आदी उपस्थित होते.शिबिरात डॉक्टरांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या दातांची काळजीपूर्वक तपासणी केली आणि दातांच्या आरोग्याशी संबंधित विविध समस्यांवर मार्गदर्शन केले.

शिबिराला शाळेच्या सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका जयश्री श्रीवास्तव यांनी केले.

## शिक्षक हे आयुष्याचे मार्गदर्शक, काम-ताण यांचा समतोल शिकवतात - डॉ. शिवाजी सुक्रे

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ सप्टेंबर- आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि भावनेने साजरा करण्यात आला. यावर्षी ७० वर्षांवरील ज्येष्ठ सदस्यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. समाजहितासाठी व वैद्यकीय क्षेत्रासाठी कार्यरत असलेल्या या वरिष्ठ डॉक्टरांचे आयुष्यभराचे कार्य पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरले आहे.



सत्कारमूर्तींमध्ये डॉ. आनंद मलिक, डॉ. अशोक बगडिया, डॉ. दत्ता कदम, डॉ. के. एस. भोपले, डॉ. मधुसूदन भारतीया, डॉ. मृत्युंजय बिलगी, डॉ. निर्मला कदम, डॉ. साधना कुलकर्णी, डॉ. सत्यनारायण सोमाणी, डॉ. सुभाष श्रॉफ, डॉ. सुधीर भोपे, डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. सुनैना मलिक, डॉ. सुरेंद्र गोटूरकर, डॉ. विजय बोरगावकर, डॉ. विनय बऱ्हाळे, डॉ. रवींद्र झंवर आणि डॉ. उज्वला झंवर यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिवाजी सुक्रे, अधिष्ठाता, सरकारी वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर व डॉ. विनायकुमार राठोड, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. अनुपम टाकळकर, अध्यक्ष, आयएमए छत्रपती संभाजीनगर यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे डॉ. शिवाजी सुक्रे म्हणाले, शिक्षक हे आपल्या आयुष्याचे मार्गदर्शक आहेत. ते केवळ ज्ञान देत नाहीत तर जीवनातील प्रत्येक टप्प्यावर प्रकाश टाकतात. वैद्यकीय व्यावसायिक केवळ डॉक्टर नसतात, ते समाजाचे नेते आणि मार्गदर्शकही असतात. आजच्या काळात काम आणि ताण यांचा समतोल साधण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरते.

सूत्रसंचालन डॉ. शिवाजी पोले व डॉ. सोनाली सावजी यांनी केले. समन्वयक डॉ. आसावरी टाकळकर होत्या. आभार प्रदर्शन डॉ. सभाजी चिंतले यांनी केले. सचिव डॉ. योगेश लक्कस यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले.

या कार्यक्रमात भूतपूर्व अध्यक्ष डॉ. उज्वला दहीफळे व भूतपूर्व अध्यक्ष डॉ. यशवंत गाडे यांचीही उपस्थिती होती.

संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ज्येष्ठांचा सन्मान आणि त्यांच्या जीवनप्रवासातून मिळालेली शिकवण तरुण डॉक्टरांसाठी मार्गदर्शक ठरली. शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयएमएने ही परंपरा अधिक समृद्ध केली.

## फर्दापूर येथे सात लंम्पी ग्रस्त गुरे आढळून आले

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ९ - फर्दापूर येथे पुन्हा सात गुरे लंम्पी ग्रस्त आढळून आले फर्दापूर येथे सात गुरे लंम्पी ग्रस्त असलेल्या ठिकाणी फर्दापूर येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ गजानन लांडगे यांनी स्वतः शेतात जाऊन या गुरांना लसीकरण करून ऐंशी टक्के बरं केले परंतु डॉ गजानन लांडगे यांनी शेतकरी यांना सांगितले की या गुरांना एका ठिकाणी बांधून चारा पाणी देण्यात यावा जोपर्यंत हा बैल शंभर टक्के बरा होत नाही तोपर्यंत त्याला दुसऱ्या गुरासोबत बांधू नका कारण ते गुरं लंम्पी ग्रस्त होतील तसेच सर्व जनावरांना शेतकरी मित्रांनी लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे त्यामुळे जनावरांना लंम्पी ग्रस्त होण्यापासून संरक्षण होईल.



## शिक्षक सेनेच्या प्रमुख पदाधिकारी नियुक्त्या



पैठण दि ०९:- महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना तालुका शाखा-पैठणच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती पैठणचे कर्तव्यदक्ष आमदार विलासबापू भुमरे यांच्या हस्ते व राज्य प्रसिद्धीप्रमुख महेश लबडे, जिल्हाप्रमुख अमोलराजे एरंडे, पैठण तालुकाप्रमुख कैलास मिसाळ, तालुका संपर्कप्रमुख अमोलराज शेळके, गणपत मिटकर, प्रवीण फटांगडे,श्रीकांत कराड, ईश्वर खंदारेआणि आजिनाथ दहिफळे यांच्या उपस्थितीत करण्यात आल्या.

नव्याने नियुक्ती मिळालेले पदाधिकारी तालुका सरचिटणीस लक्ष्मण गलांडे, तालुका कार्याध्यक्ष पांडुरंग गोर्डे,तालुका कोषाध्यक्ष प्रल्हाद पाखरे तालुका प्रसिद्धीप्रमुख मनोज अंधारे याप्रमाणे आहे. या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे आमदार विलासबापू भुमरे सह उपस्थित सर्वांनी मनापासून अभिनंदन करून पुढील संघटनात्मक कार्यास शुभेच्छा दिल्या.


**जाहिर समन्स**

**मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या न्यायालयात**

नियमीत दिवाणी दावा नंबर २६/ २०१८

प्रतिभा व ईतर विरुद हिरामण व ईतर

नि.क्रं. २७/डी

प्रती,

प्रतिवादी क्रं. ३,

चिंतामण हिरामण कोळी,

वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद.

ज्याअर्थी वादी नामे प्रतिभा चिंतामण कोळी (निकम) व ईतर २ यांनी तुमच्या विरुदध वाटपांकरीता मिळण्यासाठी या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्यात तुम्हाला समन्स बजावणीसाठी पाठविले असता सदरचे समन्स न बजावता परत आल्याने तुमचे विरुदध जाहीर समन्सचा आदेश झालेला आहे. सबब तुम्हास या जाहीर समन्सदवारे कळविण्यात येते की, सदरच्या दाव्यात तुम्हास हजर होण्यासाठी तारीख ३०/०९/२०२५ ही ठेवण्यात आलेली आहे. तरी तुम्ही सदर तारखेस सकाळी ११:०० वाजता स्वतः अगर तुमच्या वतीने अधिकृतरित्या अधिकार दिलेल्या व्यक्ती किंवा वकीलामार्फत या न्यायालयात हजर राहुन तुमचे म्हणणे सादर करावे. तुम्ही सदर तारखेस हजर राहुन तुमचे म्हणणे दाखल न केल्यास दाव्याची सुनावणी तुमचे अपरोक्ष होवुन निकाल दिला जाईल याची नोंद असुन दयावी.

दिले असे. करीता आजरोजी दिनांक ०२/०९/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह आदेशावरुन

विभीगीय लिपीक | सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)



जावक क्रमांक ४८२३/२०२५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,

बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड,

छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद

दि. ०३/०९/२०२५

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन. क्रमांक: ARN/02969/18/25

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक: ---

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री निर्मलेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट मयूर पार्क छत्रपती संभाजीनगर बाबत ।

न्यासाचा पत्ता: प्लाट नं १५८ गट नं १९० पी, सी १०-०-२ मयूर पार्क... छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद, औरंगाबाद

अर्जदार- विनोद शंकर गवारे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Cash In Hand in possession of president | 7000.00 |

(अ) जंगम मिळकतः रोख रु. ७०००/- मात्र

(अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्ण)

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्याकन किंवा स्वरूप | मुदत / कालावधी | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

(ब) स्थावर मिळकत रोख रु. /- मात्र - (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०२-०९-२०२५ रोजी दिली.

अधिक्षक

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

छत्रपती संभाजीनगर



जा.क्र./जे-३/४८८९/२०२५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,

दि. ०४/०९/२०२५

**चौकशीची जाहीर नोटीस**

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.

चौकशी अर्ज क्रमांक: जे-३/४३३/२०२५ कलम :- १९

न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: श्री. वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर बाबत....

अर्जदार : श्री. चंपालाल अमोलकचंद कर्णावट

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, सहाय्यक धर्मादाय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मालमत्ता (वर्णन) रुपये १०,०००/- अध्यक्षाकडे जमा.

ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास अगर पुरावा देणेचा असल्यास त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयात वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०३/०९/२०२५ रोजी दिली असे.

न्यायशाखा (अधिक्षक)

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

छत्रपती संभाजीनगर.

## अग्रलेख...

# 'नवारो'जींचा थयथयाट

डोनाल्ड ट्रम्प यांनी ७ ऑगस्ट रोजी २५ टक्के अतिरिक्त व्यापारशुल्क लादत भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. रशियाकडून जर कच्चे तेल विकत घेणे बंद केले नाही तर यापेक्षाही आणखी कठोर निर्बंध लादण्याची धमकी दिली. २७ ऑगस्टपासून ५० टक्के शुल्क लावण्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकन धोरणावर टीका केली. भारतही जशास तसे उत्तर देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. २५ ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाला न जुमानता, भारत कोणत्याही परिस्थितीत शेतकरी, गोपालक आणि लघु उद्योगांच्या हिताशी तडजोड करणार नसल्याचे ठणकावून सांगितले. ५० टक्के शुल्काचा आता खुद्द अमेरिकेतील उद्योजकही मोठ्या प्रमाणात विरोध करीत आहेत. वॉशिंग्टन येथील द एशिया ग्रुपचे वरिष्ठ सल्लागार मार्क लिनस्कॉट यांनी दोन्ही देशांमधील व्यापार आणि राजकीय घडामोडींवर गंभीर चिंता व्यक्त केली. अवघ्या काही महिन्यांपूर्वी ज्या देशांचा व्यापार 'विन-विन' परिस्थितीत होता, तो आता तोट्याकडे मार्गक्रमण करीत आहे. दोन्ही देशांसाठी ही बाब चांगली नाही, असे मत लिनस्कॉट यांनी व्यक्त केले. विशेष म्हणजे याच मुद्यावर एलन मस्कही ट्रम्प प्रशासनापासून दूर गेले आणि त्यांनी भारताची बाजू योग्य असल्याचे मत मांडले. ट्रम्प यांच्या प्रशासनात असे काही मंत्री आणि सल्लागार आहेत जे सातत्याने भारतविरोधी वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. त्यामध्ये सध्या आघाडीवर आहेत ते व्हाईट हाऊसचे सल्लागार पीटर नवारो. त्यांनी ७ ऑगस्टला एक पोस्ट करीत, भारत नफा कमविण्याच्या उद्देशाने रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याचे आणि युद्ध भडकवीत असल्याची टीका केली होती. मात्र, मस्क यांनी नवारो यांच्या ट्विटला उत्तर देताना, तुम्ही सर्व बाजूंनी विचार करायला हवा. सोशल मीडिया हे मते मांडण्याचे असे एक ठिकाण आहे जिथे सर्व काही उघड होते. लोक आपली मते मांडतात आणि त्यातूनच जनमत तयार होत असते, अशा शब्दांत त्यांनी नवारो यांना सुनावले. मस्क यांच्या उत्तराने नवारो यांचा चांगलाच तिळपापड झाला. मस्क यांचे नाव न घेता नवारो यांनी, काही जण भारतीय हिताच्या रक्षणासाठी कार्य करीत आहेत, अशी टीका केली. रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्याची भारताची भूमिका न्यायसंगत असून, ऊर्जा सुरक्षेसाठी कोणताही देश हा अशीच भूमिका स्वीकारत असतो. एकीकडे अमेरिका भारतावर कच्चे तेल खरेदी करण्याबाबत दबाव आणत असताना दुसरीकडे हा देश रशियाकडून युरेनियमची खरेदी मोठ्या प्रमाणात करीत आहे. त्यामुळे भारतावरील आरोप दुटप्पीपणाचे असल्याच्या प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी व्यक्त केल्या.

नवारो हे ट्रम्प यांचे जवळचे मानले जातात. २०१६ मधील राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावली होती. अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. असलेले नवारो यांनीच प्रचारात टॅरिफचा मुद्दा उपस्थित करावयास लावला. खुद्द ट्रम्प यांच्यावर नवारो यांचा मोठा प्रभाव आहे. पहिल्या कार्यकाळात ट्रम्प यांनी आर्थिक सुधारणांचा झपाटा लावला होता. त्यामागचे डोके हे नवारो यांचेच होते. चीनचे ते कट्टर विरोधक मानले जातात. परिणामी त्यांच्या सल्ल्यानुसारच चीनवर मोठ्या प्रमाणात व्यापारशुल्क आकारले होते. व्यापारातील घाटा कमी करणे हे अमेरिकन अर्थव्यवस्थेपुढील मोठे आव्हान असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. भारताबाबतही त्यांनी कडक धोरणाचा अवलंब केला. रशियाचा आधार घेत नवारो यांनी भारतावर अतिरिक्त २५ टक्के शुल्क आकारण्यास भाग पाडल्याचे बोलले जाते. भारतासोबतचा कच्च्या तेलाचा व्यापार हा रशियाच्या अर्थव्यवस्थेची लाईफलाईन असल्याचा कांगावा त्यांनी सुरू केला. भारत अमेरिकन वस्तूंवर मोठ्या प्रमाणात शुल्क आकारतो. ज्याचे परिणाम अमेरिकन उत्पादकांना भोगावे लागत आहेत. नवारो सातत्याने भारतविरोधी वक्तव्य करीत असतात. विविध वृत्तपत्रांमधून सातत्याने ते भारतविरोधी भूमिका मांडत असतात. २०१९ मध्ये त्यांनी 'वॉल स्ट्रीट जर्नल'मध्ये लेख लिहून भारताच्या आर्थिक धोरणावर टीका केली होती. भारत अमेरिकन वस्तूंवर ९०, तर चीन ८५ टक्के शुल्क आकारत असल्याने स्पर्धा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अमेरिकन वस्तू चीन आणि भारतात विकणे म्हणजे मोठा तोटा सहन करणे होय. दोन्ही देश अमेरिकेपासून फायदा करवून घेतात, पण त्यांची बाजारपेठ अमेरिकन वस्तूंसाठी बंद ठेवत असल्याचे त्यांनी लेखात नमूद केले होते.

एकीकडे भारतासोबतचे संबंध 'रिसेट' होऊ शकतात, अशी भूमिका खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतली असताना नवारो आगीत तेल ओतत असल्याने दोन्ही बाजूंनी संभ्रमाचे वातावरण तयार होऊ लागले आहे. नवारो यांचा इतिहासही फारसा चांगला नाही. काँग्रेसने घेतलेल्या निर्णयाचा अनादर केला म्हणून त्यांना चार महिने तुरुंगवासाची शिक्षाही सुनावण्यात आली आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळातही ते व्हाईट हाऊसमध्ये कार्यरत होते. त्यावेळी चीनविरोधात त्यांनी आघाडीच उभारली होती. जानेवारी २०२१ मध्ये अमेरिकेत मोठी दंगल उसळली होती. घटनेची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीने व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या हिंसाचारप्रकरणी नवारो यांच्याकडे पुराव्यांची मागणी केली होती. काँग्रेसने नियुक्त केलेल्या या समितीच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने न्यायालयाने शिक्षा सुनावली. राष्ट्रपतींच्या वरिष्ठ सहकाऱ्याला शिक्षा सुनावण्याची २००८ नंतरची ही पहिलीच घटना होय.

नवारो आणि उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे दोन्ही देशांतील संबंधात गेल्या दीड महिन्यांपासून तणाव निर्माण झाला असतानाच एक असाही गट सक्रिय आहे की जो मध्यस्थांच्या मार्फत संबंध सुरळीत करण्यावर भर देत आहे. म्हणूनच ट्रम्प यांनी मोदी हे महान नेते आहेत, असे वक्तव्य काही दिवसांपूर्वी केले आहे. ट्रम्प यांनी व्यक्त केलेल्या भावनेचा आदर आहे. त्यांनी दोन्ही देशांतील भागीदारीबद्दल केलेल्या सकारात्मक मूल्यांकनाला आणि दोन देशांमधील विशेष नात्याबद्दल केलेल्या कौतुकाला आपण पूर्ण प्रतिसाद देत असल्याची भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. परिणामी दोन्ही देशांमधील तणाव कमी होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. संबंध 'रिसेट' होण्यामागे लॉबिस्ट जेसन मिलर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. त्यांनी वॉशिंग्टनमध्ये थेट ट्रम्प यांची भेट घेत संबंधातील कटुता कमी होत असल्याचे संकेत दिले आहेत. मिलर हे एका लॉबिंग फर्मचे प्रमुख आहेत. दोन्ही देशांतील राजनैतिक संबंध पुढे जावेत म्हणून भारताने त्यांची नियुक्ती १० मे रोजीच केली होती.

अमेरिकेत लॉबिंग परंपरा फार जुनी आहे. जवळपास १९५० पासून अमेरिकेत लॉबिस्ट नेमण्याची परंपरा सुरू आहे. भारतीय दूतावासाने परिस्थितीनुसार वेळोवेळी लॉबिंग फर्म नेमल्या आहेत. २००७ मधील आण्विक कराराच्या काळातही भारताने अशाच फर्मची मदत घेतली होती. भारताने अमेरिकेच्या दबावापुढे न झुकता आणि उलट व्यापारशुल्क न आकारता वेट ॲण्ड वॉचची भूमिका घेतली आहे. जगातील सर्वांत मोठी महाशक्ती असलेल्या देशासमोर भारत भक्कमपणे पाय रोवून उभा ठाकल्याने जगही आश्चर्यचकित झाले आहे. ही परिस्थिती फार काळ चालणार नाही याची जाणीव असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेने लादलेल्या ५० टक्के टॅरिफमुळे ज्या निर्यातदारांना तोटा सहन करावा लागणार आहे त्यांच्यासाठी उपाययोजना करणे सुरू केले आहे. कापड, रत्ने, कोळंबी, पादत्राणे, विद्युत आणि यांत्रिक यंत्रसामग्री निर्मिती क्षेत्रातील निर्यातदारांसाठी लवकरच आर्थिक मदत जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी दिली आहे. अर्थात भारताने दीर्घ आर्थिक लढ्याची तयारी दर्शविल्याचे स्पष्ट झाले आहे.

## आंतरराष्ट्रीय

# नव्या मैत्रीची अमेरिकेला धास्ती

**प्रा. जयसिंग यादव**

चीनने गेल्या आठवड्यात आपल्या शक्तीचे प्रदर्शन केले. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीला ८० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित लष्करी परेडमध्ये हे शक्तिप्रदर्शन करण्यात आले. हजारो किलोमीटर अंतरावर वॉशिंग्टन डीसीमध्ये उपस्थित असलेले अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पदेखील यावर लक्ष ठेवून होते. ते म्हणाले की, मी ते पाहावे अशी त्यांची इच्छा होती आणि मी ते खरोखर पाहत होतो. तियानमेन चौकात झालेल्या या भव्य समारंभाबद्दल अमेरिकन अध्यक्षांनी तपशीलवार काहीही सांगितले नाही; परंतु त्यांनी 'खूप, खूप प्रभावी' असे वर्णन केले. दुसरीकडे, ट्रम्प आणि उर्वरित जगासाठी चीनचा संदेश अगदी स्पष्ट होता. तो संदेश असा होता की, जगात एक नवीन शक्ती-केंद्र तयार होत आहे. ते शंभर वर्षे जुन्या अमेरिकन वर्चस्व व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी सज्ज आहे. ही लष्करी परेड आयोजित केली जात होती, त्या दिवशी ट्रम्प ओव्हल ऑफिसमध्ये पोलंडच्या राष्ट्राध्यक्ष कॅरोल नवरात्स्की यांना भेटत होते. त्या वेळी ते चीनच्या या लष्करी परेडबद्दल जास्त काही बोलले नाहीत. चीनसोबतच्या 'टॅरिफ वॉर' दरम्यान घडलेल्या घटनांबद्दल ट्रम्प यांच्या विधानांमध्ये उदासीनता, तक्रार आणि चिंता यांचे मिश्रण स्पष्टपणे दिसून येत होते. परेडबद्दल ट्रम्प निष्काळजी दिसले. त्यांनी सांगितले की, दोन डझनहून अधिक राष्ट्रप्रमुखांसमोर चीन करत असलेल्या शक्तिप्रदर्शनाची चिंता नाही. तथापि, चीन दुसऱ्या महायुद्धातील योगदानाचे श्रेय अमेरिकेला देत नाही, याबद्दल त्यांनी तक्रार केली. तुम्ही अमेरिकेविरुद्ध कट रचत असताना कृपया पुतिन आणि किम जोंग उन यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा कळवा, असे ते उपहासाने म्हणाले. एकंदरीत, इतर राष्ट्रांचे एकत्र येणे ट्रम्प यांना अस्वस्थ करत आहे.

ट्रम्प यांना परेड आणि लष्करी शक्तीच्या प्रात्यक्षिकांबद्दल विशेष प्रेम आहे. गेल्या महिन्यात त्यांनी अलास्कामध्ये पुतिन यांचे रेड कार्पेटवर स्वागत केले. त्यांच्या डोक्यावरून स्टेल्थ बॉम्बर आणि अमेरिकन जेट उडत होते. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी अमेरिकन सैन्याच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त वॉशिंग्टनमध्ये लष्करी परेडचे आयोजन केले होते. चीनची नवीनतम लष्करी परेड उच्च तंत्रज्ञानाची शस्त्रे आणि शिस्तबद्ध मार्चिंगसाठी ओळखली गेली. त्या तुलनेत अमेरिकेच्या लष्करी इतिहासाची आठवण करून देणारी अमेरिकन परेड ही एक सामान्य घटना होती. तिथे दुसऱ्या महायुद्धात वापरले जाणारे टँक आणि क्रांतिकारी काळातील सैनिक व्हाईट हाऊसजवळील कॉन्स्टिट्यूशन अव्हेन्यूवर आरामात फिरताना दिसले.



ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या घोषणेवर आधारित ही एक प्रकारची आठवणींना उजाळा देणारी घटना होती. अमेरिकेच्या गौरवशाली इतिहासाकडे मागे वळून पाहताना आणि या कार्यक्रमाद्वारे ट्रम्प १९ व्या शतकातील त्या काळाची आठवण करताना दिसले. त्याला ते 'अमेरिकन इतिहासातील सर्वांत महान युग' म्हणतात.

चीनच्या लष्करी परेडमध्ये त्याची भविष्यातील शस्त्रे प्रदर्शित करण्यात आली आणि तेथील कम्युनिस्ट सरकारने हेदेखील दाखवण्याचा प्रयत्न केला की दुसऱ्या महायुद्धात फॅसिझम आणि साम्राज्यवादाला पराभूत करण्यात चीनने मोठी भूमिका बजावली. त्या युद्धाने तथाकथित 'अमेरिकन शतका'ची सुरुवात केली असेल, तर चीन आता नवी जागतिक व्यवस्था निर्माण करण्यात यशस्वी होईल, असा त्यांचा दावा आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात त्यांचे सहायक असलेले रिचर्ड विल्की म्हणाले की, दुसऱ्या महायुद्धात जपानच्या पराभवात चिनी राष्ट्रवादी आणि अमेरिकन सैन्याचे योगदान चिनी कम्युनिस्ट सैन्याच्या योगदानापेक्षा जास्त होते. तथापि, या आठवड्यात चीनची लष्करी परेड हे अमेरिकेला चिंता करण्याचे एकमेव कारण नव्हते. याशिवाय अमेरिकन धोरणकर्त्यांना चिंता वाटावी, अशी आणखी बरीच कारणे होती. तियानजिनमधील शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दरम्यान, चीन आणि भारतातील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचे एक मोठे कारण म्हणजे ट्रम्प यांनी भारतावर लादलेले शुल्क. त्याचा भारत आणि अमेरिकेतील मैत्रीवर विपरीत परिणाम झाला आहे. ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणामुळे जगाचे आर्थिक आणि राजकीय ध्रुवीकरण बिघडले आहे. प्रतिस्पर्धी मानले जाणारे चीन, रशिया आणि भारत हे देश बदललेल्या परिस्थितीत एकत्र कसे येऊ शकतात याचे एक उत्तम उदाहरण आहे.

ट्रम्प यांनी अमेरिकन उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी आणि सरकारसाठी नवीन महसूल उभारण्यासाठीच्या योजनेचा एक भाग म्हणून शुल्कांचे समर्थन केले आहे. ट्रम्प समर्थित 'अमेरिका फर्स्ट फॉरेन पॉलिसी इन्स्टिट्यूट' मधील अमेरिकन सिक्युरिटीचे सह-अध्यक्ष रिचर्ड विल्की म्हणतात, कोरियन, जपानी, फिलिपिन्स आणि व्हिएतनामी लोकांना हे चांगलेच ठावूक आहे की खरा धोका त्यांच्या अमेरिकेसोबतच्या व्यापार भागीदारीतील किरकोळ अडथळे नसून चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याचा आहे. ट्रम्प अनेकदा इतर देशांमधील संघर्ष आणि चिंतांबद्दल उदासीन राहिले आहेत. त्याबाबत मदत करत नाहीत. त्याऐवजी ते ग्रीनलॅण्ड, पनामा आणि कॅनडासारख्या भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या जवळ असलेल्या देशांमधील समस्यांबद्दल उत्सुकता दाखवत आहेत. विजय दिनाच्या परेडमध्ये चीनने जगाला आपले लष्करी सामर्थ्य दाखवले. त्यातून लक्षात आले की, ट्रम्प यांच्या व्यापार धोरणांमुळे अमेरिकेचा विजय होण्याऐवजी अपयश येण्याचा धोका आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या अमेरिकाकेंद्रित व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून लादलेले शुल्क अमेरिकन न्यायालये रद्द करू शकतात. नव्हे, तशी चिन्हे वाढत आहेत. गेल्या आठवड्यात एका अपील न्यायालयाने निर्णय दिला की, ट्रम्प यांचे बरेच शुल्क संघीय कायद्याच्या चुकीच्या अर्थ लावण्यावर आधारित होते; पण ट्रम्प यांनी या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याचा निर्णय घेतला आहे.

सर्वोच्च न्यायालयात ट्रम्प यांचे समर्थक मानले जाणारे रूढिवादी न्यायाधीशांचे वर्चस्व असले, तरी काँग्रेसच्या परवानगीशिवाय प्रमुख धोरणे अंमलात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रपतींविरुद्ध त्यांनी खूप कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या शुल्कांवर ते सौम्य भूमिका घेतील, अशी शक्यता कमी आहे. व्यापाराच्या बाबतीत ट्रम्प नेहमीच त्यांच्या मनाचे ऐकत आले आहेत. त्यांनी अनेक पारंपरिक धोरणे बदलली असून नवीन व्यापारी भागीदार बनवले आहेत. ट्रम्प यांनी दावा केला आहे की, त्यांचे व्यापार धोरण अमेरिकेला 'दुसऱ्या सुवर्णयुगाकडे' घेऊन जाईल; पण तियानमेन चौकातील चिनी लष्करी परेड असो किंवा अमेरिकन न्यायालये; ट्रम्प यांच्या शुल्कामुळे निर्माण झालेला धोका काल्पनिक नाही, तर वास्तविक आहे. भारताच्या वृत्तीबद्दल ट्रम्प यांची चिडचिड वाढत असल्याचे दिसून आले. एकीकडे भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकला नाही, तर दुसरीकडे अमेरिका आपल्या देशातच अनेक समस्यांनी वेढली गेली आहे. असे असूनही, ट्रम्प यांची हेकेखोरी कायम होती; परंतु आता त्यांना वास्तवाची जाणीव झाली असावी. त्यामुळे अगोदर त्यांनी चीनमुळे भारत, रशियासारखे मित्र आम्ही गमावले, असे म्हटले होते. त्यानंतर दोनच दिवसांमध्ये त्यांनी भारताचे आणि मोदी यांचे कौतुक केले. भारत आणि अमेरिका यांच्यात एक विशेष संबंध आहे. इतकेच नाही, तर त्यांनी आपण नेहमीच मोदी यांचे मित्र राहू असे म्हटले. ट्रम्प यांचे बदललेले सूर पाहता भारताच्या दबावाच्या परराष्ट्रनीतीचा परिणाम झालेला दिसतो.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# नव्या पिढीचे तंत्रज्ञान उद्योग आणि वास्तव

आधुनिक युगात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर उद्योगांसाठी आवश्यक बनला आहे. डिजिटल साधनांचा वापर करून उद्योजक कमीत कमी वेळेत जास्त मूल्यवर्धन करू शकतात. जग अधिक तंत्रज्ञान आधारित होत असताना डिजिटल क्षेत्रात कंपन्यांसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा शिरकाव फक्त आपल्याला अपडेट ठेवण्यासाठी राहिला नाही, तर तो व्यक्तिमत्त्व घडवणारा आणि बदल घडवणारा घटक बनला आहे. नव्या पिढीचे वागणे, विचार करणे, निर्णय घेणे हे सगळे सोशल मीडियाच्या ट्रेंडवर आधारित झाले आहे. प्रत्येक गोष्टीत झटपट यश हवे. प्रत्येक प्रयत्नामागे तत्काळ पैसे हवेत अशी मानसिकता तयार होत चालली आहे. हेच आपल्या देशातील तरुणाईच्या व्यवसाय क्षेत्रातील दृष्टिकोनावरही स्पष्टपणे उमटवत डिजिटल उद्योगांना चालना देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार अनेक योजना राबवत आहेत. जसे की डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र मार्फत राबवल्या जाणाऱ्या योजना. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातूनही विविध योजना जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत राबवल्या जातात. केंद्र सरकारच्या डिजिटल इंडिया या योजनेअंतर्गत उद्योजकांना डिजिटल साधनांचा वापर करून व्यवसाय वाढवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही एक केंद्र सरकारची योजना आहे. उद्योगांच्या स्थापनेसाठी आर्थिक मदत प्रोत्साहन देते. या योजनेअंतर्गत डिजिटल उद्योगांसाठी अर्ज करता येतो. जिल्हा उद्योग केंद्रांच्या माध्यमातून केंद्र सरकार लहान आणि मध्यम उद्योगांना आवश्यक त्या सेवा, सुविधा आणि आर्थिक साहाय्य पुरवते. यामध्ये डिजिटल उद्योगांचाही समावेश आहे. डिजिटल उद्योगाची कास म्हणजे डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून व्यवसायाची प्रगती करणे, नवीन संधी शोधणे, कार्यक्षमतेत वाढ करणे. तरुणांसाठी अनेक उद्योग संधी उपलब्ध आहेत. ज्यामध्ये तंत्रज्ञान आधारित कृषी आणि अन्न प्रक्रिया, पर्यटन, सेवा क्षेत्र, अक्षय ऊर्जा यांचा समावेश आहे. या संधी शोधण्यासाठी तरुणांनी आपली आवड, कौशल्ये ओळखून बाजारपेठेतील मागणीचा अभ्यास करावा तसेच सरकारी योजना, आर्थिक मदत आणि प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. जगातील जवळजवळ ९० टक्के तरुण विकसनशील देशांमध्ये राहतात. यातील जवळजवळ एक अब्ज तरुण पुढील १० वर्षांत नोकरीच्या बाजारात प्रवेश करतील. या तरुणांना अर्थपूर्ण आर्थिक संधी मिळतील याची खात्री करणे, गरिबी कमी करण्यासाठी सुरक्षित स्थिर समाज सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहे.

आज पदवी घेण्याच्या आधीच किंवा अनेकदा महाविद्यालयात शिकत असतानाच अनेक तरुण सोशल मीडियावरील एखादा प्रेरणादायी व्हिडीओ बघतात. त्यातून प्रभावित होतात. स्टार्टअप सुरू करण्याची स्वप्न पाहतात किंवा लगेचच व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतात. ते कुठल्याही क्षेत्रात- जसे की ग्राफिक डिझायनिंग, व्हिडीओ एडिटिंग, डिजिटल मार्केटिंग किंवा कंटेंट क्रिएशन थोडे फार शिकतात आणि मार्केटमध्ये उतरतात. सुरुवातीला या क्षेत्रांमध्ये काही प्रमाणात प्रतिसादही मिळतो, कारण आजच्या जगात नवीन हेच आकर्षण आहे. पण या सगळ्यामागे अनुभवाचा, परिपक्वतेचा आणि व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव असतो. व्यवसाय हा केवळ एक कल्पना, गुणवत्ता किंवा इंटरनेटवर बघितलेली यशोगाथा नसते. व्यवसाय म्हणजे दीर्घकाळ टिकणारी सेवा, संबंध आणि विश्वासाचे जाळे असते. ती केवळ एक व्हिडीओ बघून किंवा दोन प्रोजेक्ट करून तयार होत नाही. यासाठी सातत्य, धीर, वेळ आणि अनुभवातून आलेल्या परिपक्वतेची गरज असते. व्यवसायात टिकून राहण्यासाठी शिस्त, नम्रता आणि नवीन शिकण्याचा संस्कार असावा लागतो. भारत हा जगातील सर्वांत तरुण देश मानला जातो. ३५ वर्षांखालील लोकसंख्या ६५ टक्क्यांहून अधिक आहे. या मोठ्या लोकसंख्येला डेमोग्राफिक डिव्हिडंड म्हटले जाते. म्हणजेच योग्य शिक्षण, प्रशिक्षण आणि संधी मिळाल्यास ही तरुणाई देशाला आर्थिक महासत्ता बनवू शकते. आजचा काळ तंत्रज्ञानाचा आहे. उद्योग, व्यापार, शिक्षण, शेती, प्रशासन, मनोरंजन, आरोग्य, जीवनाचा प्रत्येक भाग डिजिटल माध्यमांवर चालतो. यालाच आपण डिजिटल उद्योग म्हणतो. या उद्योगाने तरुणांसाठी अनंत संधी निर्माण केल्या आहेत. मात्र या सोबत आव्हाने आणि धोकेसुद्धा आहेत. त्यामुळे या विषयाकडे केवळ आशावादाने नाही, तर वास्तवदृष्टीने पाहणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील तरुणांकडे शिक्षण, कल्पकता, मेहनत करण्याची ताकद आहे. योग्य नियोजन, डिजिटल साक्षरता शासनाचे पाठबळ मिळाल्यास महाराष्ट्रातील तरुण डिजिटल उद्योगात देशाचे नेतृत्व करू शकतात.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# मत्स्योत्पादनातील संधी, धोरणात्मक विकास

**दत्तात्रेय आंबुलकर**

भारताला लाभलेला विस्तीर्ण समुद्र किनारा व त्याशिवाय देशांतर्गत मोठ्या नद्या, तळी व पाणवठ्यातून सुरू असणारे गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन आणि त्याला मिळालेली मत्स्यव्यवसायाशी संबंधित कसबी कौशल्य, यामुळे आपल्या मत्स्यव्यवसायाला सुगीचे दिवस लाभले आहेत.

सद्य:स्थितीत देशातील मासळी उत्पादन मत्स्यव्यवसाय मोठ्या गतीने विकसित होत आहेत. मासेउत्पादन हा विशेषतः सागरी किनाऱ्यावर पण मोठ्या प्रमाणात परंपरागत समजल्या जाणाऱ्या व्यवसायाला दरम्यानच्या काळात प्रगत स्वरूप प्राप्त झाले. विविध प्रकारच्या व महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांमुळे या व्यवसायाची रोजगारसंधींच्या संदर्भातील उपयुक्तता देखील सिद्ध झाली आहे.

प्रचलित अंदाजानुसार, मत्स्यव्यवसाय क्षेत्रात प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे तीन कोटी रोजगार-स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. याशिवाय, मत्स्यव्यवसायाशी निगडित पूरक उद्योगांमध्येसुद्धा विविध रोजगार-व्यवसायसंधी उपलब्ध आहेत. याला जोड मिळत गेली, ती सरकारी धोरणे आणि आर्थिक धोरणात्मक पाठबळाची. यातून विविध व्यावसायिक बदल, तंत्रज्ञानाचा स्वीकार व मत्स्यनिर्यात यांसारखे प्रयोग यशस्वीपणे राबविले जात आहेत. थोडक्यात म्हणजे, भारताच्या ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक उलाढालीत मत्स्यव्यवसायाचे आता महत्त्वपूर्ण स्थान आणि योगदान राहिले आहे. आपल्या मत्स्यव्यवसायाच्या संदर्भात झालेला मोठा व महत्त्वाचा बदल म्हणजे, कधीकाळी खाण्यासाठी व पोटासाठी विशिष्ट लोकांसाठी असणाऱ्या या व्यवसायाला आता विज्ञान-तंत्रज्ञान व संशोधनासह व्यवसाय-व्यापाराच्या संदर्भात अद्ययावतता प्राप्त झाली आहे. याचे प्रत्यंतर आता खाऱ्या-गोड्या या दोन्ही प्रकारच्या पाण्यातील मासेमारी व्यवसायांत येताना दिसते. मुख्य म्हणजे, त्याला आता अनेक पूरक व महत्त्वाच्या व्यवसायांची जोड लाभली आहे. त्याशिवाय समुद्रतटाप्रमाणेच ग्रामीण भागातील अल्पभूधारक व शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होतो. मासेमारीशी संबंधित सर्वांच्या आर्थिक स्थितीतही त्याचे सकारात्मक परिणाम झालेले दिसून येतात. यामध्ये प्रत्यक्ष मत्स्योत्पादन, मासेमारी, त्यांची साठवण, प्रक्रिया व वाहतूक यामुळे फार मोठ्या संख्येतील युवकांपासून महिलांपर्यंत सर्वांना बारमाही उदरनिर्वाहाचे साधनच नव्हे, तर घरगुती व छोट्या-मोठ्या स्वरूपाचे व्यवसाय उपलब्ध होऊ लागले, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. यासंदर्भात केंद्र सरकारच्या नव्या धोरणात्मक निर्णयांद्वारे मासेमारीच्या धोरणांतर्गत राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय मत्स्यपालन, पशुपालन व दुग्धोत्पादन खात्याचे मंत्री राजीव रंजन सिंह यांनी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत मासेमार व मत्स्योत्पादन क्षेत्रासाठी राष्ट्रीय स्तरावर १६ विशेष योजनांची घोषणा केली आहे. याचे परिणाम आता दिसू लागले आहेत.

यामध्ये देशपातळीवर ३४ मत्स्यपालनाला पूरक-पोषक स्वरूपाचे १४ विशेष विभाग विशेष अभ्यासानंतर बनविण्यात आले आहेत. यामध्ये देशभरातील नद्या व तळ्यांशिवाय पहाडी लडाखपासून सुदूर मेघालयात उपलब्ध असणाऱ्या व उत्पादित करता येणाऱ्या मत्स्योत्पादन व त्यावरील संशोधनासह त्याला अधिक उत्पादक व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर बनविण्यावर योजनापूर्वक भर देण्यात आला. मुख्य म्हणजे, यामध्ये भातशेतीसारख्या पाणवठ्यासह करण्यात येणाऱ्या शेती व शेततळ्यांचा कल्पकपणे समावेश करण्यात आला आहे. देशात फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या भातउत्पादक शेतकऱ्यांना या प्रयत्नांचा मोठा व दूरगामी स्वरूपात लाभ होऊ घातला आहे.

या नव्या व प्रस्तावित मत्स्योत्पादन केंद्रांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, त्याद्वारे निर्माण होणाऱ्या रोजगार-स्वयंरोजगारांच्या मोठ्या संधी. या संधींचा लाभ प्रामुख्याने पिढीजात मासेमार, या क्षेत्रात नव्याने दाखल होणारे युवक, मासेमार सहकारी संस्था, महिला अल्पबचत गट, मत्स्यउद्योगातील स्टार्टअप संस्था नाबार्डद्वारा पुरस्कृत संस्था, मत्स्यउत्पादन, प्रक्रिया, बारमाही साठवण व वाहतूक क्षेत्रात उपलब्ध झाल्या आहेत अथवा होऊ घातल्या आहेत.

मासेमार क्षेत्रात केंद्र व राज्य सरकार, मासेमार संस्था व त्यांच्याशी संबंधित सहकारी व वैयक्तिक प्रयत्नांचे फलित आता दृश्य स्वरूपात आलेले दिसते. गेल्या दोन दशकांतील या संदर्भातील आकडेवारीसह सांगायचे झाल्यास, २००४ मध्ये देश पातळीवर असणाऱ्या मत्स्योत्पादनाचे ६३.९९ लाख टन असणारे प्रमाण २०१४ मध्ये ९५.७९ लाख टन, तर आता म्हणजे २०२४ मध्ये १८४.०२ लाख एवढे लक्षणीय स्वरूपात वाढले आहे.

मत्स्यपालन-मत्स्योत्पादनाच्या संदर्भात भारत आज जगात दुसऱ्या स्थानावर आहे. जगातील एकूण मत्स्यव्यवसायातील आठ टक्के उत्पादन हे भारतात होते. याशिवाय, गोड्या पाण्यातील मासेउत्पादनात तर भारताने जगात पहिला क्रमांक मिळविला आहे. यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे, गेल्या दशकात शासन स्तरावर अनेक धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांचा करण्यात आलेला पाठपुरावा. यामध्ये पुढील धोरणांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल.

**प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना** : सन २०२० मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत २० हजार कोटी उलाढाल केवळ पाच वर्षांत झाली आहे. योजनेमध्ये आजवर दोन हजारांपेक्षा अधिक मासेमार सहकारी संस्थांसह ४.५ लाख किसान क्रेडिटकार्डधारक मासेमार सहभागी झाले आहेत.

**नील-क्रांती योजना** : देशाच्या सागरी किनाऱ्याप्रमाणेच लहान-मोठ्या नद्या, तळे, पाणवठे, धरणे इ. ठिकाणीपण तेवढ्याच मोठ्या प्रमाणावर मत्स्यपालनाला गतिमान करणे व त्याद्वारा ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देऊन त्याद्वारे रोजगार-स्वयंरोजगार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता.

**मत्स्यपालन व्यवसाय विकासनिधी** : केवळ मासेमारीपुरतेच मत्स्यव्यवसायाला मर्यादित न ठेवता, त्याच्याशी संबंधित महत्त्वाच्या अशा अप्रत्यक्ष व्यवसायांद्वारे विविध संधी उपलब्ध व्हाव्या, यासाठी सर्वप्रथम २०१८ मध्ये ७ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

**विविध व मोठ्या रोजगारसंधी** : आज भारताच्या मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून मत्स्यउत्पादन, शीतगृह संचालन, मत्स्यप्रक्रिया, मत्स्यबीजनिर्मिती, विक्री-व्यवसाय व मत्स्यनिर्यात इ. क्षेत्रांत रोजगारांच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या. त्याशिवाय मत्स्योत्पादन क्षेत्रासाठी आवश्यक व पूरक अशा व्यवसाय, व्यवस्थापन, वाहतूक इ. क्षेत्रांत तेवढ्याच मोठ्या प्रमाणावर रोजगार-स्वयंरोजगार उपलब्ध झाले आहेत, हे विशेष.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### ज्येष्ठ नागरिक व भूमाफिया

आपले स्वत:चे घर बांधू, या आशेने अनेक ज्येष्ठ नागरिकांनी अनेक वर्षांपासून आपले मेहनतीने कमावलेले पैसे जमीन खरेदीत गुंतवले. याचाच फायदा भूमाफियांनी घेत अनेक ज्येष्ठांना फसवून स्वत:च्या तुंबड्या भरल्याची अनेक प्रकरणे नागपुरात अनेक वर्षांपासून न्यायप्रविष्ट असल्याचे दिसते. कधी जमीन विकत घेण्यासाठी तर कधी हाऊसिंग सोसायटीच्या बहाण्यापोटी पैसे जमा करून आपले नातलग त्यात घुसवून, त्यावर आपली पकड बसवून नागरिकांना लुबाडणे व प्रकरण न्यायप्रविष्ट झाले तर वकिलांच्या मदतीने न्याय देण्यात विलंब करणे, अशी कार्यप्रणाली गुन्हेगारांनी अवलंबून अनेक ज्येष्ठ नागरिकांवर अन्याय केला आहे. आपल्या मालकीच्या घरांची स्वप्ने पाहत कित्येक ज्येष्ठ नागरिक देवाघरी गेले की या भूमाफियांचे फावते, कारण त्यांच्या वारसांना याबद्दल विशेष माहिती नसते किंवा आवश्यक ती कागदपत्रे प्रविष्ट करण्यात ते कमी पडतात. अशी प्रकरणे विलंबित होण्यास न्यायालये व सरकार दरबारी असलेली निष्क्रियता चांगलीच मदत करतात. याबद्दल 'गुंठेवारी'सारखे कायदे सुद्धा आहेत. पण वकिलांना हाताशी धरून हे 'हुशार' माफिया निकाल यायला उशीर कसा होईल व आपण कसे सहीसलामत राहू, याचाच प्रयत्न करतात. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, अशा प्रकरणाचा त्वरित निपटारा करण्यासाठी एक खास आयोग नेमावा व ज्येष्ठांना न्याय द्यावा. मुख्यमंत्री याबाबतीत जातीने लक्ष घालतील व असमर्थ ज्येष्ठ नागरिकांना त्वरित न्याय मिळवून देतील, ही एकमेव आशा आहे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

### ध्वनिप्रदूषणाबाबत सरकार खरेच गंभीर आहे का?

नुकताच महाराष्ट्रात गणेशोत्सव अत्यंत उत्साहात साजरा झाला. या गणेशोत्सवात राज्य सरकारतर्फे ध्वनिक्षेपक वापराची परवानगी रात्री १२ वाजेपर्यंत वाढवून देण्यात आली होती. गणपती विसर्जन मिरवणुकीत बऱ्याच मंडळांनी डीजेचा उपयोग केला. पुणे-मुंबईसारख्या शहरात जिथे गणपतीची मिरवणूक २०-२२ तास चालते अशा ठिकाणी रात्री १२ वाजता डीजे बंद करून पुन्हा सकाळी ६ वाजता सुरू करून मिरवणूक निघाली. ध्वनिप्रदूषणाबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी असे सरकारला वाटते, पण दुसरीकडे सरकार तरुणाई खुश व्हावी म्हणून ध्वनिक्षेपक वापर करण्याची रात्री १० पर्यंतची वेळ २ तास वाढवते हे अनाकलनीय आहे.



**मोहन पांडे**/नागपूर

### थोडे ज्येष्ठांकडेही लक्ष द्यावे

केंद्र सरकार शोषित, पीडित, वंचित मध्यम वर्गीयाची सतत चिंता करीत आले आहे. या वर्षीच्या दसरा, दिवाळीच्या शुभमुहूर्तावर जीएसटीमध्ये केलेली सुधारणा हा त्यातलाच एक भाग आहे. बहुतेक सर्व जीवनावश्यक वस्तूंवर लावण्यात आलेला जीएसटी १८ टक्क्यांवरून सरसकट ५ टक्क्यांवर आणण्याचा निर्णय मध्यमवर्गीयांना देखील दिलासा देणारा आहे. त्यामुळे यापुढे जीवनावश्यक वस्तू कमी दरात मिळतील. दसरा, दिवाळी आनंदाने साजरे करता येतील. पंतप्रधान आणि अर्थमंत्री अभिनंदनास पात्र आहेत. वर्ष २०१४ पासून ईपीएस ९५ अंतर्गत लाखो कामगारांना एक हजार रुपये प्रति माह निवृत्ती वेतन मिळत आहे. त्यात सुधारणा व्हावी यासाठी सतत प्रयत्न सुरू आहेत. ७ व्या वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार किमान निवृत्ती वेतन प्रति माह ९ हजार रुपये मिळायला पाहिजे. मोहिनी गिरी आयोगाने देखील सर्वांना निवृत्ती वेतन मिळायला पाहिजे अशी शिफारस केली आहे. असे असताना गत ११ वर्षांपासून केवळ १ हजार रुपये निवृत्ती वेतन देणे अन्यायकारक नाही का? कोविड १९ च्या कार्यकाळात ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे भाड्यात मिळणारी सवलत बंद करण्यात आली. कोविड आला आणि गेला. पण मिळणारी सवलत जी त्यावेळी बंद झाली ती आजही बंदच आहे. भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या १४.९० कोटी आहे. त्यातले किमान ७० टक्के ज्येष्ठ नागरिक गरिबी रेषेखाली जीवन जगत आहे. ही आकडेवारी ज्येष्ठ नागरिकांच्या वैयक्तिक उत्पन्नावर आधारित आहे. त्यांना प्रवास भाड्यात मिळणारी सवलत बराच दिलासा देणारी ठरणार आहे. वरील दोन विषय केंद्र सरकारच्या अधिकार क्षेत्रातील आहेत. काही वर्षांपासून प्रलंबित आहेत. केंद्र सरकारला विनंती आहे की वरील मागण्यांकडे त्वरित लक्ष घालून दसरा, दिवाळीपूर्वी योग्य ती कार्यवाही करावी आणि लाखो ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा पदरी पाडून घ्याव्यात.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अनिलदादा जगताप फाउंडेशनचा पुढाकार; बीडमध्ये 'रेंज पाहिजे' नाटकाचा पहिला प्रयोग ११ सप्टेंबरला

## रसिक प्रेक्षकांनी जास्तीतजास्त संख्येने नाट्यप्रयोग पाहण्यासाठी यावं– अनिलदादा जगताप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ सप्टेंबर**

अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीडच्या रंगभूमीवर नवचैतन्याचा श्वास घेणाऱ्या 'रेंज पाहिजे' या दोन नाटकाची निर्मिती करण्यात आली असून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनिल दादा जगताप फाउंडेशनने पुन्हा एकदा बीड कलाकारांना मदतीचा हात देऊन बीड रंगभूमीवर नाट्यदीप प्रज्वलीत केला आहे. गुरुवार दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी सायं ६.०० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे शहरातील सत्तर कलाकारांचा सहभाग असणाऱ्या रेंज पाहिजे या नाटकाचा पाहिला प्रयोग सादर होणार आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा संस्कृतक उपक्रमात सक्रिय सहभाग असतोच. मात्र हे संस्कृतीक क्षेत्र प्रगत व्हावं यासाठी कलाकार तयार होणे गरजेचे आहे आणि कलाकार तयार करण्यासाठी कलाकारांना आधार द्यावा




लागेल याकरिता अनिलदादा जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. अनिलदादा जगताप फाउंडेशन बीड आणि शिवसेना आयोजित रेंज पाहिजे या नाटकाचे दिग्दर्शन लक्ष्मीकांत दोडके यांनी केले असून या नाटकाचे लेखन सौ. सोनलताई नहार यांनी केले आहे. सहाय्यक दिग्दर्शक म्हणून रोहित पुराणिक तर निर्मिती सूत्रधार प्रतिक कांबळे आहेत. रसिक प्रेक्षकांच्या अंतर्मनाला स्पर्श करणारं आणि तितकंच विनोदी असणारं रेंज पाहिजे नाटक बीडकरांना मनोरंजनाची पर्वणी असणार आहे.

'बीडमधील तब्बल ७० कलाकारांनी. एकत्रित प्रयत्न, अथक मेहनत आणि कला हीच खरी साधना या भावनेतून त्यांनी रेंज पाहिजे ही अद्भुत कलाकृती रंगभूमीवर आणली आहे. ही कलाकृती केवळ नाटक नाही तर बीडच्या खंड पडलेल्या नाट्यचळवळीला मिळालेली संजीवनी आहे. आता या नाट्यज्योतीला तेजस्वी करण्याची जबाबदारी सुजाण रसिक श्रोत्यांची आहे. कलाकारांनी आपलं कर्तव्य पार पाडलं आहे. आता प्रेक्षकांनी आपली साथ, आपले टाळ्यांचे दान, आपली उपस्थिती देऊन या नवचैतन्याला खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण करावं. कारण नाटक हे कलाकार व प्रेक्षक यांच्यातील जिवंत नातं आहे. तेव्हा चला, आपण सारे या नाट्ययज्ञात सहभागी होऊ या आणि बीडच्या नाट्यपरंपरेला पुन्हा एकदा सुवर्णयुगाकडे नेऊ या. असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ सप्टेंबर**



हरित आणि प्रदूषणमुक्त शहराच्या निर्मितीसाठी बीड जिल्हा प्रशासनाने आज एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या मोहिमेमुळे शहराचा सौंदर्यवृद्धीसोबतच पर्यावरण संवर्धनालाही बळकटी मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः झाडाचे रोप लावून मोहिमेचा शुभारंभ केला. त्यांनी या निमित्ताने शहरातील प्रमुख रस्त्यांच्या डिव्हायडरवर तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या उपक्रमाअंतर्गत शहराच्या मुख्य रस्त्यांवर व महामार्गालगत हजारो झाडे लावली जाणार आहेत. या वृक्षांमुळे केवळ हिरवळ निर्माण होणार नाही, तर हवेतील प्रदूषण कमी होणे, उन्हाळ्यातील उष्णता नियंत्रित राहणे, नागरिकांना शुद्ध हवा मिळणे आणि जैवविविधतेत वाढ होणे अशा अनेक स्तरांवर लाभ होणार आहेत.

आपल्या मनोगतात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, वृक्षलागवड ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित नसून, ती सातत्याने राबविण्याची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्विकारली, तर हरित बीडचे स्वप्न नक्कीच साकार होईल.

या कार्यक्रमास राष्ट्रीय महामार्गाचे उपविभागीय अभियंता श्री. राजेंद्र भोपळे, नगरपालिका सहआयुक्त श्री. संभाजी वाघमारे, नगर परिषद मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी आणि श्री. योगेश क्षीरसागर यांची देखील उपस्थिती होती. तसेच स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. पुढील काही महिन्यांत संपूर्ण शहरात ही वृक्षलागवड मोहीम राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांनी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव, सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, जिल्हा प्रमुख गणेश वरेकर, मा. जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते सर, महिला आघाडी च्या मीराताई नवले, डॉ. नयनाताई सिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सत्कार करतांना उपस्थित सर्व शिवसेना पदाधिकारी, युवा शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात मराठी विभागाचे अभ्यागत व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ सप्टेंबर**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा कौशल्ये आणि रोजगाराच्या संधी या विषयावरील अभ्यागत व्याख्यान संपन्न झाले.



स्वा.सावरकर महाविद्यालय,बीड येथील मराठी विभाग प्रा.डॉ.सोपान सुरवसे यांनी या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. माहिती तंत्रज्ञानाच्या काळात मराठी भाषा कशी रोजगाराचे साधन होऊ शकते. याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देताना सुत्रसंचालन,वृत्तनिवेदन,मुलाखत,वृत्तांत लेखन, अर्जलेखन, निवेदनलेखन, सृजनशील लेखन इत्यादी विषय त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगीतले.बदलत्या काळासोबत विद्यार्थ्यांनीही स्वतःला बदलून घेत मराठी भाषेतील नवनव्या रोजगाराच्या संधी शोधल्या पाहिजेत असे ते यावेळी म्हणाले.महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी अतिथीचे स्वागत केले.डॉ.बालासाहेब कटारे यांनी अतिथींचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिला तर प्रा.डॉ.रामनाथ वाढे यांनी आभार प्रदर्शन केले. या व्याख्यानाला पदवी प्रथम वर्षाचे विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# बंजारा समाजाला एसटी आरक्षण द्या

## सोमवारी काढणार जिल्हाधिकारी कार्यालावर मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ सप्टेंबर**

बंजारा समाजाला एसटी आरक्षण हैद्राबाद गॅझेटमधूनर देण्यात यावे या मागणीसाठी येत्या सोमवारी दि.१५ सप्टेंबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचा निर्धार समाज बांधवांकडून काल सोमवारी बीड शहरात आयोजित भव्य अशा बैठकीत करण्यात आला. या बैठकीला बीड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो बांधव मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

शहरातील सौभाग्य लॉन्स येथे झालेल्या बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. शासनाकडून मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेट लागू करण्यात आले. या गॅझेटमध्ये बंजारा समाजाला एसटी प्रवर्गाचे आरक्षण देण्यात आले होते. ते आरक्षण देण्याची मागणी करत बैठक पार पडली. यावेळी समाजातील अनेक तज्ञ मंडळींकडून समाजाला मार्गदर्शन करण्यात आले. ही बैठक समस्त बंजारा समाज या नावाखाली पार पडली. यावेळी आलेल्या समाज बांधवांना १५ सप्टेंबर रोजी निघणाऱ्या मोर्चा संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयाची विद्यार्थिंनी मंजुषा दगडू राऊत गृहशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ सप्टेंबर**



येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील गृहशास्त्र विषयाची विद्यार्थिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर हिने एप्रिल मे २०२५ च्या विद्यापीठस्तरीय पदव्युत्तर परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तिच्या या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल अध्यक्ष श्री.किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर,सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर, पूजा भारतभूषण क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर,तसेच डॉ.वंदना फटाले,श्याम कुरे, दादासाहेब खोबरे,गृहशास्त्र विभागातील सर्व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# टेंबे गणपतीला भावपूर्ण वातावरणात निरोप

## मानाचे टेंबे सहभागी १२५ वर्षांची ऐतिहासिक परंपरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ सप्टेंबर**

सवाशे वर्षांची परंपरा असलेला व नवसाला पावणारा गणपती म्हणून राज्यभर ओळख असणाऱ्या टेंबे गणपतीला भावपूर्ण वातावरणामध्ये ढोल ताशाच्या गजरामध्ये दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी निरोप देण्यात आला.शहरातील टेंबे गणेश मंडळाला सव्वाशे वर्षांची परंपरा असून यंदाचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने मंडळाच्या वतीने गणेशोत्सव काळात भरगच्च अशा विवीध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. गणपती दर्शनाला राज्यासह मराठवाड्यातुन भाविकांनी गर्दी केली. भाविक - भक्तांकडुन टेंबे गणपतीला पावणेदोन किलो चांदीचे दागिने अर्पण करण्यात आले तर पाच दिवसांमध्ये सोन्या - चांदीचे मोदक, दूर्वा श्रीचरणी अर्पण केल्या. आमदार प्रकाश सोळंके यांचे वतीने बांधकामाकरिता पाच लाख रूपयांचा निधी दिला तर खा. अजित गोपछडे यांचे वतीने सुसज्ज अशा सभागृहासाठी पन्नास लाख रूपयांचा निधी देण्याची घोषणा केली.



विसर्जन मिरवणुकीतील शाहिस्तेखानाची फजिती हा ऐतिहासिक तर जगन्नाथाचा रथ, ऑपरेशन सिंदूर या धार्मिक देखाव्याने शहरवासीयांचे लक्ष वेधले. विसर्जन मिरवणुकीत मंडळाचे अध्यक्ष अनंतशास्त्री जोशी, विश्वनाथ जोशी, रविंद्र जोशी, ॲड. बी. आर. डक, अमोल मुळी, शिवाजी देशमुख, बाळकृष्ण जोशी, किशोर जोशी, उदय जोशी, सचिन बजाज यांचेसह भाविक मोठ्या संख्येने सहभागी होते तर चौका - चौकांमध्ये भक्तगणांसाठी खिचडी, फराळ, फळवाटप विवीध मंडळाने व सामाजिक संघटनांनी केले. यावेळी पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला.

# मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या सुगाव अंबाजोगाई येथील तरुणाच्या कुटुंबियांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.९ सप्टेंबर**

अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथील मराठा समाजातील तरुण नितीन माणिकराव चव्हाण यांनी ३० ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणासाठी गळफास घेऊन आत्महत्या केली होती; माजी मंत्री तथा परळी मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज स्वर्गीय नितीन चव्हाण यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने श्री मुंडे यांनी मयत नितीन चव्हाण यांच्या कुटुंबियांना तातडीची एक लाख रुपयांची मदत केली असून, स्व नितीन चव्हाण यांना दोन मुली आहेत, त्या दोन्हीही मुलींच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी देखील धनंजय मुंडे यांनी स्वीकारली असल्याचे यावेळी कुटुंबियांना सांगितले.

दरम्यान मराठा आरक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या मराठा सेवकांना राज्य शासनाच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली असून, स्व. नितीन चव्हाण यांच्याही कुटुंबीयांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी आपण मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले.

या प्रसंगी धनंजय मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर आबा चव्हाण, तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, बबन लोमटे, आबा पांडे, विलास बापू मोरे, अजित गरड, रणजित लोमटे, प्रवीण जगताप, गुणवंत आगळे, उपसरपंच गणी भाई, नामदेव शिंदे यांसह पदाधिकारी तसेच ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक आदी उपस्थित होते.

# लोकनेते मुंडे साहेबांचा बीड रेल्वे ड्रीम प्रोजेक्ट ना.पंकजाताईच्या अथक प्रयत्नांतून पूर्ण

## मुख्यमंत्री १७ रोजी दाखवणार हिरवा झेंडा–जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**कडा दि.९ सप्टेंबर**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा अहिल्यानगर ते बीड रेल्वे ड्रीम प्रोजेक्ट ना. पंकजाताई मुंडे व माजी खा.प्रितमताई मुंडे यांच्या अथक प्रयत्नाने पूर्ण होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून अहिल्यानगर ते बीड रेल्वे १७ सप्टेंबरला प्रत्यक्षात धावणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दि. १७ रोजी हिरवा झेंडा दाखवुन शुभारंभ करणार आहेत, परळी पर्यंतचा ड्रीम प्रोजेक्ट ना. लवकरच पुर्ण होईल असे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगीतले.

याबाबत अधिक माहिती देताना भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले की, आष्टी, पाटोदा शिरूर,बीड या भागातील जनतेचे रेल्वेचे स्वप्न १७ सप्टेंबर रोजी प्रत्यक्षात साकार होणार आहे. गेल्या कित्येक वर्षापासून जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक अहिल्या नगर बीड परळी हा रेल्वेमार्ग कधी पूर्ण होतो याची चातकाप्रमाणे वाट पाहत होते, अखेर तो क्षण जवळ येऊन ठेपला आहे. सुरुवातीला अहिल्या नगर ते आष्टी हा पहिला टप्पा पुर्ण करुन आष्टी पर्यंत रेल्वे सुरू करण्यात आलेली आहे. आता पुढील काम पुर्ण झाल्याने बीड पर्यंत रेल्वे धावणार असुन परळी पर्यंतचे काम प्रगतीपथावर आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी अहिल्यानगर बीड परळी रेल्वेचे स्वप्न पाहिले होते व ते पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करत असताना काळाने त्यांचा घात केला पण लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण करण्याचा विडा त्यांच्या कन्या ना. पंकजाताई मुंडे व तत्कालीन खा. डॉ. प्रितम ताई मुंडे यांनी उचलून राज्य व केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्याने आता प्रत्यक्षात रेल्वे धावण्याची वेळ आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परळी येथील सभेत रेल्वेसाठी केंद्र सरकार संपूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले होते आणि दिलेल्या शब्दाप्रमाणे त्यांनी वेळच्या वेळी निधी उपलब्ध करून दिला. लोकसभा सदस्य असताना डॉ. प्रितमताई मुंडे यांनी वेळोवेळी लोकसभेत या विषयावर पाठपुरावा केला.लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांनी राज्यात ग्रामविकास मंत्री असताना राज्य सरकारला या रेल्वेसाठी अर्धा वाटा देण्यास भाग पाडले. दोन्ही मुंडे भगिनींनी या रेल्वेसाठी अथक परिश्रम करुन बीडकरांचे व मुंडे साहेबांचे स्वप्न साकार केले आहे. यांच्या प्रयत्नांची फलश्रुती आहे.नगर बीड रेल्वेमुळे जिल्ह्याच्या विकासाला निश्चित चालना मिळणार आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी अहिल्यानगर ते बीड रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे त्यादृष्टीने रेल्वे प्रशासन आणि गतीने कामाला लागले आहे. तसेच बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील भूसंपादनाच्या कामालाही प्रशासकीय गती दिली आहे. आष्टी पाटोदा शिरूर बीड लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार आहेत. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आहे त्या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे.

# अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे शनि दि १३ सप्टें रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ सप्टेंबर**

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन शनिवार दि १३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेस बँकेच्या सर्व सन्माननीय सभासद व ग्राहकांनी उपस्थित राहण्याचे अवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे .



अठ्ठावीस वर्षापूर्वी अंबाजोगाई शहर व येथील नागरिकांची आर्थिक गरज लक्षात घेवून केवळ अंबाजोगाई शहरासाठी राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची सुरुवात केली होती. आज ही बँक आपल्या ग्राहकांच्या विश्वास व आर्थिक बळाच्या जोरावर १८ शाखा व दोन विस्तारित शाखांच्या माध्यमातून नागरिकांना सेवा देत आहे . आज केवळ अंबाजोगाई शाखेत ३८ हजाराच्या वर ग्राहक व खातेदार आहेत तर बँकेच्या सर्व शाखांचे मिळून एक लाखाच्या वर ग्राहक आहेत . हे सर्व ग्राहक बँकेवर विश्वास ठेवून आपला व्यवहार या बँकेत करत आहेत.

बँकेच्या वतीने हजारो गरजवंत सुशिक्षित बेरोजगार , लहानमोठे व्यावसायिक, व्यापारी, हातगाडी व फेरीवाले यांना त्यांचा व्यवसाय व कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कर्जाच्या स्वरूपात मदत करण्यात येत आहे . तसेच बँक वेळोवेळी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात देखील अग्रेसर असते. बँकेने ठेविचा ६०० कोटींचा टप्पा ओलांडत वार्षिक उलाढालीत १००० कोटींचा टप्पा पार केला आहे. या वार्षिक आर्थिक उलढालीचा लेखाजोखा मांडून तो मंजूर करून घेण्यासाठी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि १३ सप्टेंबर २०२५ ,शनिवार रोजी संध्याकाळी ६:०० वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आली आहे . बँकेच्या वार्षिक सभेनंतर लगेच प्रीती भोज सभासदांसाठी आयोजित करण्यात आला आहे. याचा देखील आस्वाद घेण्याचे तसेच बँकेच्या २९ व्या आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेस सर्व सभासद मंडळींनी उपस्थित राहून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच सर्व सन्माननीय संचालक मंडळ तथा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे.

# टर्मेक्स हिंगोली हळद सहकारी संस्थेच्या प्रवर्तक प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ११ महिला प्रवर्तकांची निवड, महिला शेतकऱ्यांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**

जिल्ह्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांना सामूहिक बळ देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या टर्मेक्स हिंगोली हळद सहकारी संस्था मर्यादित या संस्थेच्या प्रवर्तक निवड प्रक्रियेचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा कृषी अधिकारी अतुल वायसे, जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुफाटे तसेच सहायक उपनिबंधक बालाजी पठाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी ११ महिला प्रवर्तकांची निवड करण्यात आली.
या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विक्रम सारस्वत यांनी करून हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी या संस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी या संस्थेमुळे शेतकऱ्यांना केवळ उत्पादन विक्रीची नवी दारे उघडणार नाहीत तर प्रक्रिया उद्योग, साठवण सुविधा, ब्रँडिंग आणिराष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याची संधी उपलब्ध होईल, असे सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली रमेश यांनी आपल्या मनोगतात हिंगोली जिल्हा हळद उत्पादनासाठी ओळखला जातो, या पार्श्वभूमीवर या संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट फायदा होणार असल्याचे नमूद केले. सहकारी संस्थेच्या कार्यक्षम व्यवस्थापनाद्वारे उत्पादनाला चांगला दर मिळावा आणि शेतकऱ्यांच्या कष्टाचे योग्य मूल्यमापन व्हावे, यासाठी प्रशासनाचे पूर्ण सहकार्य राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.
प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांनी ग्रामीण भागातील शेतकरी यशस्वी सहकारी चळवळीमुळे आत्मनिर्भर होतील, असे सांगून संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जिल्हा कृषी अधिकारी अतुल वायसे यांनी वैज्ञानिक शेतीपद्धती व गुणवत्तापूर्ण उत्पादनाद्वारे हिंगोलीची हळद राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख प्रस्थापित करेल, असा विश्वास व्यक्त केला. जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुफाटे यांनी संस्थेच्या नोंदणी व पुढील प्रशासकीय प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले.
या निवड प्रक्रियेला हळद उत्पादक महिला शेतकरी, बचत गट सदस्य उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मोठ्या संख्येने झालेल्या सहभागामुळे संस्थेच्या भविष्यातील काम काजासाठी ठोस पायाभरणी झाली असल्याचे मान्यवरांनी स्पष्ट केले.
टर्मेक्स हिंगोली हळद संस्थेत ५४८ हळद उत्पादक महिलांनी नोंदणी केली आहे. यामध्ये वसमत तालुक्यातून सर्वात जास्त १५८, कळमनुरी १४९, औंढा नागनाथ ९३, हिंगोली ७८ तर सेनगाव तालुक्यातून ७० महिलांची नोंदणी झाली आहे. या महिलांमधून ११महिलांची प्रवर्तकपदी निवड करण्यात आली आहे. यामध्ये हिंगोली तालुक्यातून तीन तर वसमत, औंढा नागनाथ, सेनगाव, कळमनुरीतून प्रत्येकी दोन महिलांचा समावेश आहे. या प्रवर्तक निवडीतून संस्थेची भक्कम पायाभरणी झाली आहे.
कार्यक्रमाच्या शेवटी महिला शेतकऱ्यांनीही आपल्या अपेक्षा व मते मांडली. सर्व उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे आणि शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे ही बैठक ऐतिहासिक ठरली असून टर्मेक्स हिंगोली हळद सहकारी संस्थेच्या कार्यास नवी दिशा मिळाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

# संचालकांची उपनिबंधकांना दमदाटी, १० जणांवर गुन्हा

## अरेरावीची भाषा वापरल्याचा संचालकांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**

हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समिती बरखास्तीवरून संचालकांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात गोंधळ घालून अधिकाऱ्यांना दमदाटी केल्याची घटना घडली असून याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात १० संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सिरसम कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत ५६ गावांचे समायोजन करण्यात आले आहे. या समायोजनासाठी हिंगोली बाजार समितीच्या संचालकांनी मंजूरी दिली होती. त्यानंतर पणन संचालक कार्यालयाने दिलेल्या मंजूरीनंतर हिंगोली बाजार समितीमध्ये ५६ गावे समायोजित करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुपाटे यांनी हिंगोली बाजार समिती बरखास्त करून त्याठिकाणी प्रशासकाची नियुक्ती केली होती. हिंगोली बाजार समितीवर जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुपाटे यांची नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी ५ सप्टेबर रोजी पदभार देखील स्विकारला.
जिल्हा उपनिबंधक फुपाटे या दि ८ सप्टेबर रोजी त्यांच्या कार्यालयात काम करीत असतांना काही संचालक त्याठिकाणी आले. त्यांनी फुपाटे यांना दमदाटी करून तुम्ही बाजार समितीवर प्रशासक का बसविला, आमदारांच्या म्हणण्यावरून काम करता का, तुम्ही हुकुमशहा आहेत काय असे बोलून गोंधळ घातला.
याप्रकरणी उपनिबंधक फुपाटे यांनी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यावरून पोलिसांनी बाजार समितीचे संचालक संतोष टेकाळे, मनीष आखरे, माधव कोरडे, आनंदराव जगताप, साहेबराव देशमुख, उत्तमराव वाबळे, परमेश्वर मांडगे, गजानन घ्यार, बबन नेतने, रमेश शिंदे यांच्या विरूध्द सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक संदीप मोदे, सपोनि संगमनाथ परगेवार, जमादार अशोक धामणे, संजय मार्के पुढील तपास करीत आहेत.
दरम्यान संचालकांनी बाजार समितीच्या बरखास्तीचे कागदपत्रे मागण्यासाठी गेल्यानंतर जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुपाटे यांनीच अरेरावीची भाषा वापरल्याचा आरोप केला आहे. बाजार समिती बरखास्तीची प्रत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीशिवाय व्हॉटसअॅपवर फिरल्याचे सांगितले. त्यामुळे फुपाटे चांगल्याच भडकल्या. तुम्ही माझे कालक आहात काय, तुम्हाला कागदपत्रे देत नाही काय करायचे ते करा आदेश कधी प्रसारीत करायचा हे मला शिकवू नका असे म्हणाल्या असे संचालकांनी दिलेल्या तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. या प्रकरणी शहर पोलिसांत संचालकांनी तक्रार अर्ज दिला आहे. या प्रकरणात आता शहर पोलिसांनी चौकशी सुरू केली असून त्यानंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याचे सुत्रांनी सांगितले आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास कठोर शिक्षा करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**



अकोला शहरातील गुलजारपुरा भागात एका गरीब कुटुंबातील अल्पवयीन मुलीवर नराधमाने पाशवी अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या नराधमास तत्काळ अटक करून प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून कठोर शिक्षा करा अशी मागणी भारतीय जन सम्राटच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.
अकोला शहरातील गुलजारपुरा भागात राहणाऱ्या गरीब भोई समाजातील अल्पवयीन मुलीवर तोहीत समीर या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नराधमाने अल्पवयीन मुलगी घरात एकटी असल्याचा गैरफायदा घेत पाशवी अत्याचार केले. सदरील व्यक्तीवर अशाप्रकारचे पुर्वी देखील गुन्हे दाखल आहेत. त्याने तुरूंगवासही भोगला आहे. घटनेनंतर आरोपी फरार असून पोलिस प्रशासनाने तत्काळ अटक करण्यासाठी ठोस कारवाई न केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. आरोपीला तत्काळ अटक करून सदर प्रकरणी फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा भारतीय जन सम्राटच्यावतीने देण्यात आला आहे. निवेदनावर विजय कुरवडे, दिपक धुरीया, संतोष हराळ, गणेश वानखेडे, दिपक करवंदे, संतोष आडणे, गोलू धुरीया, बालाजी नेमाडे, किशन भगत, राजेंद्र खंडागळे, आकाश संदुसे, गुड्डु नेमाडे, विजय टाक आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**हिंगोली- जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षाच्यावतीने टर्मेक्स हिंगोली हळद सहकारी संस्थेची सर्वसाधारण सभा येथील साई रिसॉटमध्ये आयोजित करण्यात आली होती. या सभेला जिल्ह्यातील हळद उत्पादन शेतकरी महिलांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी मार्गदर्शन केले. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### १५ सप्टेंबरला गाळ्यांची बोली प्रक्रिया

हिंगोली- येथील सार्वजनिक दसरा महोत्सव-२०२५ साजरा करण्याच्या दृष्टिकोनातून औद्योगिक व कृषी प्रदर्शनीमधील व बाहेरील नकाशाप्रमाणे नियोजित तयार केलेले गाळे (दुकाने) महोत्सव दरम्यान (कालावधी १४ दिवस) विविध दुकाने थाटण्याच्या दृष्टिकोनातून भाडे तत्वावर देण्यासाठी जाहीर बोली बोलून हर्राशी करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया सार्वजनिक दसरा महोत्सव समितीचे सदस्य तथा गटविकास अधिकारी यांच्या देखरेखीखाली बोली बोलण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. ज्यांची बोली जास्तीत जास्त रकमेला जाईल अशा इच्छूक धारकांना हे गाळे (दुकान) त्याच ठिकाणी पैसे भरुन देण्यात येणार आहे. इच्छूक धारकांनी वा व्यापाऱ्यांनी बोली बोलण्यासाठी रामलीला मैदान हिंगोली येथे दि. १५ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन हिंगोली सार्वजनिक दसरा महोत्सव समितीचे सचिव तथा तहसीलदार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

### गारमेंट उद्योजकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

हिंगोली- महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मुंबई पुरस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र हिंगोली यांच्या वतीने आयोजित हिंगोली जिल्ह्यातील गारमेंटवर आधारित उद्योजकांसाठी कौशल्यवृध्दी विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना, वस्त्रोद्योग क्षेत्रातील विविध कर्ज योजना, राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग अभियान, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग धोरण, वस्त्रोद्योग क्षेत्रातील क्षमता वाढवण्याची योजना या विषयावर कार्यशाळेत मार्गदर्शन मिळणार आहे. ही कार्यशाळा दि. ११ सप्टेंबर, २०२५ पासून पाच दिवस घेण्यात येणार आहे. यासाठी उमेदवार हा जिल्ह्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. त्याच्याकडे व्यवसायाचे उद्यम नोंदणी प्रमाणपत्र आणि टीसी, पासपोर्ट फोटो इत्यादी कागदपत्रे जमा करुन आपली नाव नोंदणी उद्या दि. ९ सप्टेंबर, २०२५ पर्यंत करण्यात यावी. नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी कार्यक्रम आयोजक दत्ता उचितकर (मो. ९९६०१८९३५८), महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी सुधीर आठवले यांनी केले आहे.

### आरपीआयच्या जिल्हाध्यक्षपदी मांजरमकर

हिंगोली- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. राजेंद्र गवई यांच्या आदेशानुसार पक्षाचे महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिकारी डॉ. गौतम गोसावी यांनी राज्यभरातील विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्षांच्या निवडी जाहीर केले असून हिंगोली जिल्हा अध्यक्षपदी चंद्रमुर्ती मांजरमकर यांची निवड केली आहे. चंद्रमुर्ती मांजरमकर यांची हिंगोली जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा समितीचे अध्यक्ष मधुकर मांजरमकर यांच्यासह इतरांनी अभिनंदन केले. हिंगोली जिल्ह्यात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाला जास्तीत जास्त उभारी देण्याची काम करणार असल्याचे चंद्रमुर्ती मांजरमकर यांनी सांगितले.

# वरूड संमद येथील सहकारी संस्थेची बिनविरोध निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**

सेनगाव तालुक्यातील वरूड संमद येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यव व उपाध्यक्षांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.
या निवडणुकीत अध्यक्षपदासाठी नामदेव बळीराम पवार यांचे एकच नाव आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदासाठी शिवाजी गणपतराव पवार यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांचीही बिनविरोध निवड झाली आहे. निवड प्रक्रीयेसाठी सय्यद मोबीन, संतोष राठोड यांनी काम पाहीले. यावेळी संस्थेचे सदस्य उपस्थित होते. यावेळी निवड झालेल्या अध्यक्ष व उपाध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सदस्य देवराव पाटील, माधवराव पवार, रामराव ढोकर, पद्मावती कांतराव पवार, द्वारकाबाई गंगाराम पवार, नामदेव पवार, शिवाजी पवार, विश्वनाथ फाले, साहेबराव पवार, गणेशराम पवार, भारत पवार, भीमराव धाबे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# दीड वर्षानंतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश, संघटनेकडून अंजली रमेश यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**

जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचा मागील दीड वर्षापासून प्रलंबीत असलेला पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला असून मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी पदोन्नतीचे आदेश काढल्यामुळे आरोग्य संघटनेकडून त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.
हिंगोली जिल्हा परिषदे अंतर्गत आरोग्य विभागातील आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यक यांच्या पदोन्नतीचा प्रश्न मागील दीड वर्षापासून प्रलंबीत होता. पदोन्नीतीच्या मागणीसाठी कर्मचारी संघटनेने वेळोवेळी प्रशासनाकडे निवेदन दिले होते. मात्र त्यांना प्रत्येक वेळी आश्वासनेच दिली जात होती. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या सुचनेनंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नामदेव केंद्रे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, माता बाल संगोपन अधिकारी डॉ सतीश रूणवाल यांनी पुढाकार घेऊन पदोन्नतीच्या हालचाली सुरू केल्या. त्यानंतर पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी व प्रस्ताव तयार करण्यात आले होते. त्यानुसार २१ आरोग्य सेवकांना आरोग्य सहाय्यकपदी पदोन्नती देण्यात आली. तर २२ आरोग्य सेविकांना आरोग्य सहाय्यीका या पदावर पदोन्नती देण्यात आली. याशिवाय ७ आरोग्य सहाय्यकांना विस्तार अधिकारी पदावर पदोन्नती मिळाली आहे. या पदोन्नतीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी काढले आहेत. यांमुळे आरोग्य संघटनेने अंजली रमेश यांचा सत्कार केला. यावेळी आरोग्य कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन कदम, किरण सुर्यवंशी, सुनील जगताप, एस व्ही पवार, महिला जिल्हाध्यक्षा नंदा चव्हाण, ज्योती बांगर, संगीता गोबाडे, अनिता चव्हाण, शोभा पवार यांची उपस्थिती होती. तसेच आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, डॉ सतीश रूणवाल यांचीही उपस्थिती होती.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**

सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथील *सांदिपनी पब्लिक स्कूलमध्ये ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.
कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून पहिल्या सत्रात शाळा उत्तम प्रकारे चालवली. शिक्षकांनी शिकवण्याचे तास न घेता विद्यार्थ्यांच्या कार्याचे निरीक्षण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मनोगत सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कु. संस्कृती आरसुळे, कु अक्षरा केलगेंद्रे, कु आराध्या कदम यांचा समावेश होता. कार्यक्रमात स्वागत गीत,नाट्य सादरीकरण,पर्यावरण संरक्षण - ही काळाची गरज या विषयावर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी नाटक सादर केले. तसेच इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनीही उत्तम नाट्य सादरीकरण करून उपस्थितांचे मन जिंकले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. आर्या कदम आणि कु.संचिता वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन आरव सुंधाळे, श्रीश कुलकर्णी यांनी केले.या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सौ. पुष्पा राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेकाले, आणि शैक्षणिक सल्लागार केदार शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सहभागाने आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाने अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडला.

# शिरड शहापूरमध्ये जश्ने ईद ए मिलाद उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**शिरड शहापूर, ९ सप्टेंबर**

औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापूर येथे इस्लाम धर्माचे प्रेषित मोहम्मद मुस्तफा स.अ. यांच्या १५०० व्या जन्म दिवसानिमित्त ८ सप्टेंबर रोजी सोमवारी भव्य जुलैचे मोहम्मदिया काढण्यात आला. लहान मुले, मुली आणि मुस्लिम समाज बांधव मोठ्या प्रमाणात सहभागी होते. जुलूस मध्ये ठिकठिकाणी लहान मुलांना खाऊ, चॉकलेट, बिस्किट, पाणी वाटप करण्यात आले. जुलूसाची सुरुवात सकाळी ८ वाजता रजा मस्जिद येथून झाली जुलूस पुढे दर्गा मोहल्ला, बाजार गल्ली, आंबेडकर चौक, पठाण गल्ली, मौला अली मज्जिद येथे सांगता फतेहाखानिने करण्यात आली. महाप्रसाद वाटप करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हातंर्गत शिक्षक बदलीचे आदेश

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक), परभणी यांच्याकडून जिल्हांतर्गत शिक्षक बदल्यांचे आदेश सोमवारी (दि. ८ सप्टेंबर) जारी करण्यात आले. शासन निर्णय व परिपत्रकांनुसार ऑनलाईन बदली पोर्टलवर पूर्ण झालेल्या प्रक्रियेच्या आधारे २५७ विशेष संवर्ग भाग-१, ९१ विशेष संवर्ग भाग-२, १४५६ बदलीपात्र शिक्षक आणि ४० बदलीपात्र (एश्रळसळलश्रश-२) शिक्षकांच्या बदल्या घोषित झाल्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांनी काढलेल्या या आदेशानुसार संबंधित शिक्षकांना ८ सप्टेंबर रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त करण्यात येणार असून, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळच्या सत्रात त्यांनी नवीन शाळेत रुजू होणे बंधनकारक आहे. कार्यमुक्तीच्या वेळी बदली पोर्टलवरून प्राप्त झालेला संगणकीय आदेश जोडणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शिक्षकांनी नमूद केलेली माहिती वा कागदपत्रे चुकीची आढळल्यास संबंधितांविरुद्ध शासन निर्णयानुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित होईल, असा इशारा शिक्षण विभागाने दिला आहे. तसेच बदलीवर पदग्रहण अवधी अथवा प्रवास भत्ता अनुज्ञेय नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी ज्या शाळेत शिक्षक शून्य राहतील, अशा प्रकरणांत गटशिक्षणाधिकारी यांनी पुढील आदेश येईपर्यंत कार्यमुक्ती देऊ नये, असेही निर्देश देण्यात आले आहेत. बदली आदेश हा पूर्णपणे प्रशासकीय स्वरूपाचा असून कोणत्याही कर्मचाऱ्याने राजकीय दबाव आणल्यास त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असा इशाराही आदेशात देण्यात आला आहे.

शिक्षकांचे वेतनाबाबत स्पष्ट करण्यात आले आहे की, बदली झालेल्या महिन्याचे संपूर्ण वेतन जुन्या शाळेतूनच काढले जाईल. पुढील महिन्यापासून वेतन नवीन आस्थापनेवरून दिले जाईल, मात्र कार्यमुक्तीनंतर जुन्या शाळेतून जादा वेतन निघाल्यास त्याची वसुली केली जाणार आहे. बदली आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळसेवा पुस्तिकेत घेण्याची जबाबदारी मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांच्यावर टाकण्यात आली आहे.

### चाकूचा धाक दाखवून लुट करणारा आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** चाकूचा धाक दाखवून मोटारसायकल, मोबाईल व रोख रक्कम लुटणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने अटक करून मुद्देमाल जप्त केला आहे.

ताडकळस पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, एका युवकाची हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल, मोबाईल व रोख रक्कम चाकूचा धाक दाखवून बळजबरीने लुटण्यात आली होती. या घटनेनंतर गुन्हा शाखेच्या पथकाने सापळा रचून आरोपी गोविंद अंकुशराव वारकड (रा. सारंगी, ता. पूर्णा) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चुडावा येथे घडलेल्या गुन्ह्यातही सहभाग असल्याची कबुली दिली. याशिवाय, मागील वर्षी ७ डिसेंबर रोजी पूर्णा येथून चुडावा शाखेसाठी रोकड घेऊन जाणाऱ्या मध्यवर्ती बँकेच्या कर्मचाऱ्यावर चाकूचा धाक दाखवून मारहाण करून पैसे लुटल्याचेही उघड झाले. कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपीकडून पल्सर मोटारसायकल (क्र. एचएच २२ एझेड ९२६०), ओपो कंपनीचा मोबाईल, चोरीस गेलेली होंडा मोटारसायकल आणि १५ हजार रुपये रोख असा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपीस पुढील तपासासाठी ताडकळस पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ, स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहायक पोलिस निरीक्षक पी.डी. भारती, पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, सहायक पोलिस निरीक्षक मधुकर चटे, तसेच पथकातील अंमलदार निलेश भुजबळ, रंगनाथ दुधाटे, पांडुरंग तुपसुंदर, राहुल परसोडे, लक्ष्मण कांगणे, गजानन क्षीरसागर, परसराम गायकवाड, शरद सावंत आणि सायबर पोलिस ठाण्याचे बालाजी रेड्डी व गणेश कौठकर यांच्या संयुक्त प्रयत्नांतून करण्यात आली.

### गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तरुणास पोलिसांनी केली अटक

**परभणी,/प्रतिनिधी :** नानलपेठ पोलिसांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाढविण्यात आलेल्या गस्ती दरम्यान गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या एका तरुणाला ताब्यात घेतले.

पोलिस निरीक्षक गणेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ७ सप्टेंबर रोजी पेट्रोलिंग सुरु असताना एकनाथ नगर परिसरात संशयास्पद हालचाल करणारा तरुण आढळला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे गावठी पिस्तूल आढळले. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव राहुल रावसाहेब आढळ (रा. एकनाथ नगर, परभणी) असे आहे. या प्रकरणी नानलपेठ पोलीस ठाण्याचे पो.शि. शैलेश चव्हाण यांनी फिर्याद दाखल केली असून, आरोपीवर शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी सध्या पोलिस कोठडीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ, उपविभागीय अधिकारी दिनकर डंबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गणेश कदम, उपनिरीक्षक अशोक जाटळ व त्यांच्या पथकाने केली. दरम्यान परभणी सारख्या जिल्हयात मोठया प्रमाणात गुन्हेगारी वाढलेली दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवावर संकट आले असल्याचे यावेळी पहावयास मिळत आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# एसटी आरक्षणासाठी जिंतूरात बंजारा समाजाचे आमरण उपोषण

**आजचा पाचवा दिवस: ''हैद्राबाद गॅझेटनुसार आरक्षण न मिळाल्यास संघर्ष तीव्र होणार''**

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर /प्रतिनिधी-** एसटी आरक्षणासाठी जिंतूरात बंजारा समाजाचे आमरण उपोषण'' ''हैद्राबाद गॅझेटनुसार आरक्षण न मिळाल्यास संघर्ष तीव्र होणार'' जिंतूर : हेद्राबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एसटी आरक्षणाचा लाभ द्यावा, या प्रमुख मागणीसाठी मालेगाव तांडा (ता. जिंतूर) येथील समाजबांधव विनोद विश्वनाथ आढे यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. शुक्रवारी (दि. ५ सप्टेंबर) पासून जिंतूर शहरातील वसंतराव नाईक पुतळा परिसरात त्यांनी उपोषणास सुरुवात केली. शासन व प्रशासनाकडे वेळोवेळी अर्ज, निवेदने दिल्यानंतरही बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाबाबत ठोस निर्णय न झाल्याने अखेर आरे यांना उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला. समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण अत्यावश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. उपोषण पूर्णतः शांततामय पद्धतीने होणार असून, शासन व संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी हा मार्ग स्वीकारण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य मागण्या
१. हैद्राबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एसटी आरक्षणाचा लाभ तातडीने द्यावा.
२. शासनाने या मागणीवर सकारात्मक निर्णय घेऊन तत्काळ शासकीय आदेश काढावा.
३. समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक सुविधा व योजना लागू कराव्यात.
या आमरण उपोषणामुळे जिंतूर तालुक्यातील बंजारा समाजात असंतोषाचे वातावरण पसरले आहे. समाजबांधव मोठ्या संख्येने उपोषणस्थळी दाखल होत असून, शासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे.




## जिंतूरात मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर

**उदगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय व स्व. आयोध्याप्रसाद रामनारायणजी तोणीगिवाल चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम**

**जिंतूर,/प्रतिनिधी :** अंधारमय जीवनात प्रकाशाची किरणं फुलवणारा एक प्रेरणादायी उपक्रम जिंतूर शहरात उभा राहत आहे. मानव सेवा हाच ईश्वर सेवा या विचाराने प्रेरित होऊन स्व. गिरीधरलालजी तोष्णीवाल यांच्या बाराव्या पुण्यतिथी निमित्त मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

उदगीर येथील उदगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय व स्व. आयोध्याप्रसाद रामनारायणजी तोणीगिवाल चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, औषधे, राहण्याची व जेवणाची सोय, तसेच प्रवास व्यवस्था सर्वस्वी मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. डोळ्यांतून गढूळ झालेला अंधार घालवून नव्या दृष्टीचा प्रकाश देणारे हे कार्य ग्रामस्थांसाठी वरदान ठरणार आहे. सदरील शिबिर शनिवार १३ सप्टेंबर रोजी रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत डॉ. सुभाचंद्र राठी बालक विद्या मंदिर, वरुड रोड येथे होणार आहे. फक्त २० रुपयांच्या प्रतीकात्मक नोंदणी शुल्कासह रुग्णांना या शिबिराचा लाभ घेता येणार आहे. सदरील शिबिराचा लाभ तालुक्यातील नेत्ररुग्णनी मोठ्या संख्येने घ्यावा असे आव्हान ब्रिजगोपाल तोषणीवाल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## तलाठी सज्जा बोरी येथील महसुल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचा मनमानी कारभार

**जिंतूर,/प्रतिनिधी -** तलाठी सज्जा बोरी, ता. जिंतूर, जि. परभणी येथील महसूल अधिकारी, श्री .रामेश्वर भास्करराव शिंदे व महसूल मंडळ अधिकारी श्री. गंगाप्रसाद साखरे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून १००/-₹ बाँण्डपेपर वाटणी फेरफार मंजूर केलेला आहे.

याबाबत फेरफार करण्यासंबंधी आपल्या स्तरावरून संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांना १००/- रुपये चे स्टॅम्प पेपरवर विनामोबदला वाटणी फेरफार करण्यासंबंधी आदेश दिले असल्यास आपण दिलेल्या आदेशाची प्रत मला देण्यात यावी.

तसे आदेश आपल्या स्तरावरून दिले नसल्यास संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांनी कृषी मालमत्ता ही पती-पत्नी मुलगा मुलगी नातू नात मरण पावलेल्या मुलाची पत्नी यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५(२) अन्वंये वाटणी विभाजन करिता वर्ग १ व वर्ग २ चे अधिकारी यांच्या अधिकाराचा वापर केले असल्याने व विनामोबदला वाटणी करणे संबंधी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे परिच्छेद ३४ मध्ये दाखल नवीन परंतुकानुसार जर निवासी आणि कृषी मालमत्ता ही नातेसंबंधी पती, पत्नी मुलगा मुलगी नातू नात मरण पावलेल्या मुलाची पत्नी यांना बक्षीस दिली असेल तर आकारणी योग्य मुद्रांक शुल्काची रक्कम रुपये २००/- रूपये (अक्षरी:- दोनशे रुपये) इतकी असेल यासंदर्भात परिप दिनांक २३/१२/२०१५ मधील निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे त्यामुळे संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांनी १००/- रुपये च्या स्टॅम्प पेपर वर केले असल्याने संबंधित मोजे बोरी येथील शेती गट नंबर २५४ क्षेत्रातील खातेदार हनुमानदास बन्सीलाल बुब यांनी विनामोबदला वाटणी फेरफार क्रमांक १२२८२ नुसार अनुक्रमे ०० हेक्टर ७५ आर प्रमाणे प्रत्येकी समान रित्या प्रथमेश प्रशांत बुब व प्रतिक प्रशांत बुब यांना क्षेत्राचे स्वतंत्र विभाजन करून फेरफार मंजूर केलेला आहे त्यामुळे वरील देणार व घेणार हे वरीलप्रमाणे नातेसंबंधात असल्यास त्यांच्याकडून मुद्रांक शुल्काची नोंदणी रक्कम रुपये २००/- रूपये (अक्षरी:- दोनशे रुपये) व २७३७०/- रूपये (अक्षरी:- सत्तावीस हजार तीनशे सत्तर रुपये) इतकी रक्कम वसूल करण्यात यावी.

तसेच सदरील घेणार हे (त्रस्तपक्षकार) वरील नमूद नातेसंबंधात येत नसेल तर सदरचे क्षेत्राचे बाजारी किंमत २७,१७,०००/- रुपये (अक्षरी:- सत्तविस लाख सतरा हजार रुपये) असुन त्याचे शासकीय मुद्रांक १६३०२० /- रूपये (अक्षरी:- एक लाख त्रेसष्ट हजार विस रूपये) व नोंदणी फिस २७,१७०/- रुपये (अक्षरी:- सत्तावीस हजार एकशे सत्तर रुपये) इतकी रक्कम शासनाचा महसूल बुडविले प्रकरणी आपल्या स्तरावरून सदर प्रकरणात एका आठवड्याचे आत चौकशी करून कार्यवाहीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर करण्यात यावा, आपल्या स्तरावरून याबाबत कार्यवाही न झाल्यास आपल्याला विरूद्ध वरिष्ठांकडे तक्रार दाखल करण्यात येईल अशी तक्रार शरद चव्हाण यांनी तहसीलदार जिंतूर यांच्याकडे केली आहे.

## पालम येथील महिलेच्या अंगावर सिमेंटची तंडी पडून दुर्दैवी मृत्यू

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** पालम शहरातील शनिवार बाजारा जवळील घराच्या दरवाज्या वरील सिमेंट कॉंक्रिटची तंडी महिलेचा डोक्यावर पडल्याने ४८ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, मयत सुलोचना विलास घोरपडे ह्या शनिवारी ५३० च्या सुमारास घराचा दरवाजा लावून घराबाहेर जात असताना दरवाजाच्या चौकटीवरील सिमेंट कॉंक्रीटची तंडी त्यांच्या अंगावर पडली.ते जागीच पडल्या लगेच त्याना दवाखाण्यात उपचारा साठी नेले आस्त त्याना डॉक्टरानी मयत घोषित केले. या घटना मुळे पालम शहरात हळहळ व्यक्त होत आहे.



### आनंदराव मोरे यांचे निधन



**पुर्णा,/प्रतिनिधी-** तालुक्यातील पिंपळा भत्या येथिल वारकरी संप्रदायाचे जेष्ठ नागरिक आनंदराव मुंजाजीराव मोरे यांचं रविवारी (ता.७) सप्टेंबर रोजी वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले असून, त्यांच्या पार्थिवावर पिंपळा भत्या येथील त्यांच्या शेतात रविवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास अंतिम संस्कार करण्यात आले .त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते बळीराजा साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर भगवानराव मोरे यांचे वडील होत.

### खोरस येथील परमेश्वर खंडागळे यांच्या वारसास शासकीय मदत देण्याची कारवाई

**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यातील खोरस येथील परमेश्वर साहेबराव खंडागळे (वय २५) हा युवक दि. २९ रोजी सायंकाळी ७ च्या दरम्यान लेंडी नदीत वाहून गेला.

दि.८ सप्टेबर रोजी पालम तहसिल कार्यलयात मयताचे वारस रंजनाबाई खंडागळे यांना आ.रत्नाकर गुट्टे यांच्या उपस्थित ४,०० लक्ष रूपये शासकीय मदत देण्याची कारवाई करण्यात आली. या वेळी गंगाखेड येथील उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, तहसिलदार उषाकिरण शृंगारे, महसूल स.शिवप्रसाद वाव्हळे आदी उपस्थित होते.



## भगवान महावीरांच्या जयघोषाने सेलू नगरी दुमदुमली

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलूतील दिगंबर जैन समाजाच्या वतीने दक्षलक्षण महोत्सवनिमित्त सोमवार ९ सप्टेंबर रोजी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी ढोल, ताशांच्या गजराने व भगवान महावीरांच्या जयघोषाने सेलू शहर दुमदुमून गेले. या शोभायात्रा पालखी मिरवणुकीत चिमुकल्यांसह, महिला, तरूण आणि सकल जैन समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सेलू शहरातील जैन मंदिरापासून सकाळी साडेआठच्या सुमारास शोभायात्रा निघाली. सजवलेल्या पालखीतून भगवान महावीरांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. शहरातील विविध भागातील प्रमुख रस्त्यांने पालखी मिरवणुकीचे ठिकठिकाणी उत्साहात स्वागत करण्यात आले. ढोल, ताशांच्या गजराने व भगवान महावीरांच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले.

दक्षलक्षण पर्वा निमित्त गेल्या आठ दिवसांपासून जैन मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे, आयोजन करण्यात आले होते. पंडित विराग शास्त्री, जबलपूर, पंडित सम्यक जैन, मुंबई यांचे प्रवचन दहा दिवसांमध्ये 'मेरी भावना' या विषयावर उद्बोधक, प्रेरणादायी प्रवचन संपन्न झाले. सकाळी अभिषेक, सामूहिक पूजन, प्रवचन तसेच दुपारी पंडित सम्यक जैन यांची कक्षा, प्रवचन संपन्न झाले. संध्याकाळी पाठशाला, आरती, प्रवचन व धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. जलाभिषेकांसह, स्वाध्याय, ध्वजारोहण, अभिषेकपूजन, विविध धार्मिक विधी उत्सव, भजन संध्या, विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करण्यात आले. सामुदायिक महाप्रसादचा सर्वांनी लाभ घेतला.

दस लक्षण पर्व यशस्वी करण्यासाठी समाजाच्या सर्व साधर्मी श्रावक, श्राविकांनी तसेच युवा वर्गानी परीश्रम घेतले. बहू मंडल, महिला मंडळ, पाठशाला मंडळच्या वतीने विविध स्पर्धा,सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, नाटिका घेण्यात आल्या. उत्सवासाठी सेलू शहरातील सकल जैन समाज बांधवांनी पुढाकार घेतला.

### दर्शनी भागात जैन धर्माच्या तत्वांचे दर्शन...

**दर्शनी भागात जैन धर्माच्या तत्वे ठळकपणे लक्ष वेधून घेत होती.जैन धर्माची तत्त्वे सांगितलेली आहेत. उत्तम अकिंचन्य, उत्तम त्याग, उत्तम तप, उत्तम संयम, उत्तम शौच, उत्तम आर्जव , उत्तम मार्दव, उत्तम क्षमा प्रत्येक व्यक्तीने या तत्त्वांचे पालन करून जीवनाचा खरा उद्देश साध्य केला पाहिजे, असा संदेश भगवान महावीरांनी विश्वातील संपूर्ण मानवजातीला दिला आहे.**

## अतिवृष्टीग्रस्त पिक नुकसानीचा आढावा; उपविभागीय अधिकारी शैलेश लोहोटी यांची जिंतूर तालुक्यात पाहणी



**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर महसुल विभागाची आढावा बैठक मंगळवारी (दि. २ सप्टेंबर) तहसिल कार्यालयात पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान उपविभागीय अधिकारी (सेतु) शैलेश लोहोटी यांनी भूषविले.

बैठकीस तहसिलदार राजेश सरवदे, नायब तहसिलदार प्रशांत राखे, तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, ग्राम महसुल अधिकारी तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. महसुल कामकाजाचा आढावा घेताना, अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून लोहोटी यांनी जाणून घेतली.

यानंतर उपविभागीय अधिकारी लोहोटी, तहसिलदार सरवदे, नायब तहसिलदार राखे आदींनी मौजे वाधी धानोरा व मौजे चारठाण शेतशिवारात प्रत्यक्ष पाहणी केली. शेतात उभ्या असलेल्या सोयाबीन, उडीद व कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे या पाहणीत स्पष्ट झाले.

या वेळी लोहोटी यांनी महसुल अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या नुकसानीचे अचूक पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच शेतकऱ्यांना शासनाकडून तातडीने मदत मिळावी यासाठी आवश्यक अहवाल वेळेत सादर करण्याचे निर्देशही दिले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

### बॅकवॉटरमुळे निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी

# महाराष्ट्र - तेलंगणा सरकारची संयुक्त बैठक बोलवा : खा. डॉ. गोपछडे यांची केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांकडे मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ सप्टेबर-**

नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद, बिलोली, देगलूर सह अनेक भागाला गेल्या अनेक वर्षापासून बॅकवॉटर चा फटका बसतो आहे . निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीमुळे हजारो हेक्टर वरील पिके उध्वस्त होतात. शेकडो गावांना पुराचा फटका बसतो. त्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी तेलंगणा आणि महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्र्यांची , संबंधित विभागाच्या मुख्य सचिवांची आणि जलशक्ती अधिकाऱ्यांची एक तातडीची बैठक बोलवावी . याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय



जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याकडे केली आहे. या मागणीचे निवेदन त्यांनी काल दिल्लीत जलशक्ती मंत्र्यांची भेट घेऊन दिले आहे.

महाराष्ट्र आणि तेलंगणा सीमेवर असलेल्या नांदेड जिल्ह्याला गेल्या अनेक वर्षापासून पूर परिस्थितीचा सामना करावा लागतो आहे . दरवर्षी अतिवृष्टी झाल्यानंतर गोदावरी आणि मांजरा नदीतून वाहून जाणारे पाणी हे पोचमपाड येथील श्रीरामसागरमध्ये अडवले जाते. त्यामुळे गोदावरी मांजरा, लेंडी आणि उप नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बॅकवॉटर साचते. पाण्याचा फुगवटा इतका मोठा असतो की नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद, बिलोली, देगलूर या तालुक्यातील शेकडो गावांना पुराचा वेढा बसतो. लाखो हेक्टरवरील पिके अक्षरशः खरडून जातात शेकडो पशुंनाही आपले प्राण गमवावे लागतात. शेतकऱ्यांची प्रचंड हानी होते. गावागावातील नागरिकांना हाल सहन करावे लागतात ही परिस्थिती दरवर्षी निर्माण होत असल्याने या तिन्ही तालुक्यांसह परिसरातील शेकडो गावांना आर्थिक आणि जीवितहानीचा सामना करावा लागतो, ही परिस्थिती बदलून शेतकरी आणि नागरिकांना कायमस्वरूपी दिलासा देण्यासाठी एक नवी संरचना तयार करण्याची गरज आहे . त्यासाठी महाराष्ट्र सरकार आणि तेलंगणा सरकार यांच्यात नवा समन्वय घडवून आणण्याची आवश्यकता आहे. यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री , तेलंगणाचे मुख्यमंत्री , दोन्ही राज्याचे मुख्य सचिव, जलशक्ती विभागाचे संबंधित अधिकारी तथा केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या समन्वयाने संयुक्त बैठक बोलावून निर्माण होणाऱ्या बॅकवॉटर समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात आणि दरवर्षी निर्माण होणारी पूर परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केली आहे.

# सोनखेड येथे एकाच रात्री फोडले तीन पानशॉप

**तभा वृतसेवा**
**सोनखेड, दि. ९ सप्टेबर-**

सोनखेड येथील बस स्थानक परिसरात ७ सप्टेंबरच्या मध्यरात्रीनंतरचंद्रग्रहणावेळी अज्ञात चोरट्यांनी तीन पान शॉप फोडून ३ हजाराचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली.

सोनखेड येथे सात सप्टेंबरच्या मध्यरात्री एम एच २६ बी आर ९१५७ या क्रमांकाच्या चोरीच्या दुचाकी वर येऊन सोनखेड येथील श्लोक पान शॉप,शंभू पान शॉप,गावकरी चहा सेंटर ह्या तीन शॉप फोडून यातील चहापत्ती, सिगारेट व रोख रक्कम यासह अज्ञात आरोपींनी एकंदरीत तीन हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास



केल्याची तक्रार-ज्ञानोबा नारायणराव मोरे यांच्या फिर्यादीवरून दाखल करण्यात आली आहे त्यामुळे चंद्रग्रहणाबरोबरच या पान शॉप धारकांना देखील चोरीचे ग्रहण लागले आहे तर सातत्याने होणाऱ्या चोरीच्या घटनेमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. एक वर्षा पूर्वी असेच पोलीस ठाण्या समोर संतोष किराणा दुकान फोडून लाखो रुपये नगदी रक्कम लंपास केली होती त्याचा तपास अजुन लागला नाही नंतर ठाण्यासमोरील हनुमान मंदिरातील दानपेटी फोडून लाखो रुपये लंपास केले ते चोरटे पण अजुन सापडले नाही असे प्रकार चालु असतानाच एकाच रात्री दोन पान शॉप व एक चहा चे हॉटेल फोडल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या कामगिरी वरच संशय निर्माण होत आहे आता तरी चोरटे पोलिसांना सापडतील काय....? असा सवाल नागरिका मधून होत आहे



किनवट- कुटुंबांना मदतीचा हात म्हणून 'एकल अभियान आंचल किनवट' तसेच 'दिलासा नवि उमेद' या सामाजिक संस्थेतर्फे ३०० पुरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप करण्यात आले.

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध रेती वाहतुक विरोधात कारवाई ; ४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ सप्टेबर-**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आज दि.९ सप्टेंबर रोजी पहाटे २ वा. सोनखेड परिसरात दगडगाव येथील मार्गावर छापा टाकून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई केली असून या कारवाईत ४५ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांचे पथक इतवारा भागात गस्त घालत असताना सोनखेड परिसरात रेतीची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन त्यांनी दगडगाव येथे एमएच-२६-सीएस-८८८० हा हायवा अडवून तपासणी केली. यात अवैधरित्या वाहतूक होत असलेली पाच ब्रास रेती आढळून आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या कारवाईत २५ हजारांची रेती व ४५ लाखांचा हायवा असा



एकूण ४५ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पांगरी येथील अनिल मारोती बुद्रुक यांना अटक कारण्यात आली आहे. मुद्देमाल आरोपी यांना सोनखेड पोलीसाच्या ताब्यात देवून गुन्हा दाखल करण्यात आला. हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, पोलीस अंमलदार दासरे, पोका. देवकत्ते यांच्या पथकाने केली.

## संक्षिप्त वृत्त

### भोकरमध्ये ईद-ए मिलाद निमित्त मिरवणूक

**भोकर-** मिलाद कमिटी च्या वतीने भोकर शहरात सोमवारी जश्ने ईद मिलाद उन नबीच्या निमित्ताने दि.८ सप्टेंबर रोजी ऐतिहासिक आणि भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. शहरातील



मस्जिदे आयेशा येथून सकाळी १०वाजता रॅली सुरू झाली. नांदेड रोड.उडान पुल वरून रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आली. या वेळी विविध राजकिय व सामाजिक संघटनेच्या वतीने मिलाद कमेटी च्या पदाधिकार्यांचा सत्कार करण्यात आला. रॅलीत.न.प.चे उपनगराध्यक्ष शेख युसूफ बाबाखान जवाजोद्दीन बडबेकर, हमीद खॉन, बाबु भाई तामसेकर, मिर्झा ताहेर बेगश रफीख भोजानी, शेख साबीर, ताजोद्दीन भाई, कासीम साब, मुजीब भाई, मुजीब कुरेशी मसूद भाई, अर्शद अहेमद आदि सहभागी झाले होते. ईदगाह येथे मौलाना शमशाद यांच्या मार्गदर्शनाखाली नमाजे जोहर अदा करून देशाच्या एकतेसाठी प्रार्थना करण्यात आली. मिरवणुकीदरम्यान हजारो मुस्लिम बांधव मोठ्या श्रद्धा आणि उत्साहाने सहभागी झाले. आतिफ शेख उर्फ अत्तू , उपाध्यक्ष सय्यद जुनेद पटेल, तौसीफ ईनामदार, मन्सूर खान पठाण, एजाज भाई, तुराब भाई, सोहेल मिर्झा, फैसल शेख, इरफान खादरी, मोसिन अली आदींनी परिश्रम घेतले.

### लोहा येथे ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात

**लोहा-** शहरात मुस्लिम धर्मांचे संस्थापक प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्म दिवसानिमित्त ईद-ए- मिल्लादुन्नबी मुस्लिम बांधवांनी जुलुस (मिरवणूक) काढली. जुलुस जुना लोहा मस्जिद येथुन विठ्ठलवाडी मार्ग शहरातील राष्ट्रीय महामार्ग, बाजार समितीच्या



कमान येथून मस्जिद येथे जुलुस विसर्जित करण्यात आली. हजरत मोहम्मद पैगंबर यांनी मुस्लिम धर्मांचा पवित्र धर्मग्रंथ असलेल्या कुराण शरिफ व मस्जिदीचा सुंदर देखावा सादर करण्यात आला. यावेळी मुस्लिम समाज बांधव, विद्यार्थी, यांनी सहभाग नोंदविला होता.याच बरोबर मौलाना. हाफिसाब अबरार रजवी.लोहा न.प.चे माजी गटनेते करीम भाई शेख, युवा नेते युनुस शेख .जुलुस कमिटीचे अध्यक्ष बाबा शेख .माजी नगरसेवक बाबुभाई. खादर भाई शेख.कुरेशी,उद्योजक सलीम भाई शेख,गौस पटेल, पत्रकार युनुस शेख, पत्रकार इमाम लदाफ, निहाल मन्सुरी , रहिम मिस्त्री, माजी सैनिक अहमद शेख, इस्माईल पठाण.अजिस कुरेशी, सय्यद यांच्या सहित मोठ्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. माजी आ. रोहिदास चव्हाण, उबाठा तालुका प्रमुख भिमराव पाटील शिंदे हाळदोकर, कॉंग्रेसचे कोषाध्यक्ष शिवाजी आंबेकर, बाबाराव पाटील हालगे, शंकर शेटे,यांनी शहरात मुस्लिम बांधवांनी ईद -ए- -मिलादुन्नबी काढल्याचे स्वागत केले .या जुलुसास डी.वाय एस.पी डॉ. अश्विनी जगताप व पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी चौक बंदोबस्त ठेवला होता.

### सैनिक फेडरेशनच्या जिल्हा उपाध्यक्षपदी प्रभू घोंगडे तर तालुका अध्यक्षपदी सुनील चौदंते

**मुदखेड -** सैनिक फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष ब्रिगेडियर सुधीर सावंत (निवृत) यांच्या अध्यक्षतेखाली सैनिकांचा मेळवा कुसुम सभागृह नांदेड येथे संपन्न झाला. फेडरेशनचे मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मण देवदे तसेच



मुखेड येथील राजे छत्रपती अॅकॅडमी, सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे संचालक ज्ञानेश्वर पाटील डुमणे यांच्या शिफारीशिने सैनिक फेडरेशन नांदेड जिल्हा उपाध्यक्ष पदी प्रभू महालिंगआप्पा घोंगडे, तर मुदखेड तालुका अध्यक्ष पदी सुनिल चौदंते यांची निवड झाली आहे. त्या अनुषंगाने तालुक्यातील माजी सैनिकांच्यावतीने दिनांक ८ सप्टेंबर रोजी माजी सैनिक कार्यालय मुदखेड येथे सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संघटनेचे संस्थापक व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी आमची ज्या पदावर निवड केली आहे त्या पदाची जबाबदारी स्वीकारून निस्वार्थपणे काम करू.अशी ग्वाही सैनीक फेडरेशनचे नवनियुक्त जिल्हा उपाध्यक्ष प्रभू महालिंगआप्पा घोंगडे व मुदखेड तालुकाध्यक्ष सुनील चौदंते यांनी आपल्या मनोगतातून दिली. या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी माजी सैनिक प्रभु घोंगडे, राजाराम हळदे, शशिकांत मोडवान, मारोती गुटे,संजय चव्हाण, विद्याधर तहकीक, चंद्रकांत तेलंगे, दशरथ तेलंगे यांची उपस्थीती होती.

### उमरी तालुका केंद्राची शिक्षण परिषद

**उमरी-**तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जिवला नाईक तांडा येथे दि. ८ सप्टेंबर रोजी उमरी केंद्रीय शिक्षण परिषदेचे घेण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष शंकर राठोड हे होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन गटशिक्षणाधिकारी सतीश दर्शनवाड तसेच शिक्षण विस्तार अधिकारी शंकरराव बेळकोणे, देविदास गोडगे (केंद्रप्रमुख उमरी ), माधवराव पूटवाड केंद्रीय मुख्याध्यापक उमरी , अनिल कांबळे ,शंकरोड , ईश्वरी आय्या , श्रीमती दिपाली देगावे, श्रीमती काझी यांची उपस्थिती होती. यावेळी स्कॉलरशिप ,नवोदय वर्ग, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा सहभाग ,आधार नोंदणी, संचमान्यता ,गोष्टींचा शनिवार, दप्तरमुक्त शाळा उपक्रम ,वृक्षारोपण, विद्यार्थी उपस्थित, अभ्यास ,मूल्यसंस्कार, शाळा सुशोभीकरण या संदर्भाने सर्व शाळांचा आढावा घेतला. शाळेचे मुख्याध्यापक अंबादास कस्तुरे व सहशिक्षक गजानन मरशिवने यांनी सुंदर नियोजन केले व परिषद यशस्वी केली.

# मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्या नियोजनामुळे प्रकाशाने उजळले रस्ते

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ९ सप्टेबर-**

हदगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदचे विद्युत अभियंता प्रशांत डोईजड यांनी गणेश उत्सव विसर्जन व ईद मिलादच्या मिरवणुकीच्या पूर्वीच हदगाव शहरातील मुख्य रस्त्यांवरती असलेल्या विद्युत पोलांची दुरुस्ती करून मुख्य रस्ते प्रकाशाने उजळले असून त्यामुळे शहरातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. या कामी मुख्याधिकारी यांनी आपले संबंध वापरत अर्धापुरहुन विशेष गाडीचे नियोजन लावले होते तर सदर गाडी अर्धापूरहुन प्रशांत डोईजड यांनी स्वतः चालवत आणली व नेऊन देखील सोडली त्यामुळे त्यांच्या या कामाच्या प्रती असलेली संवेदनशीलतेची कौतुक देखील



यावेळेस नागरिकांमधून होत आहे. या कामी विद्युत सहाय्यक शोएब चाऊस, दिगंबर काळे, रवी राठोड, शेख मुसा यांनी परिश्रम घेतले.

हदगाव शहरातील मुख्य रस्त्यांवरती गणेश विसर्जन व ईद मिलाद च्या पार्श्वभूमीवर तथा नेहमीच मुख्य रस्त्यांवरती प्रकाशमय असावे जेणेकरून नागरिकांना ये - जा करण्याकरिता रात्रीच्या वेळेस कोणतीही अडथळा निर्माण होऊ नये तसेच कोणतेही अनुचित प्रकारही घडू नये यासाठी दुभाजकांवरील स्ट्रीट लाईटची दुरुस्ती पार पाडण्यात आली तर काही ठिकाणी काही विद्युतपोलांची दुरुस्ती करायची असून लवकरच त्या ठिकाणीही गाडी उपलब्ध होताच त्या पोलांची देखील दुरुस्ती करण्यात येणार असल्याची माहिती विद्युत अभियंता प्रशांत डोईजड यांनी यावेळेस दिली.

# अल्पज्ञानी माणसे अतिघातक : वारघडे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ सप्टेबर-**

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दक्षिण नांदेड परिसरातील बौद्ध विहारात महावंदना घेऊन धम्मदेशना देण्याच्या स्तुत्य उपक्रम भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष हौसाजी वारघडे यांनी राबवत आहेत याप्रसंगी सिडको येथील शाहूनगर भागातील माता रमाई बुद्ध विहार



येथे धम्मदेशना देताना समाजातील अल्पज्ञानी माणसे आधी घातक असतात असे धम्मदेशना देते प्रसंगी बोलत होते.

सिडको येथील शाहूनगर भागातील रमामता बुद्ध विहार येथे दिनांक ७ सप्टेंबर रोजी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने भाद्रपद पौर्णिमा निमित्त महावंदनेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतीय बोध्द महासभेचे अध्यक्ष हौसाजी वारघडे यांनी महावंदने नंतर धम्मदेशना करताना त्यांनी समाजाच्या सर्व बाजूंच्या विचार करत धम्म आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर व समाजाची परिस्थिती उपस्थित समाज बांधवांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी असे सांगितले की समाजातील अज्ञानी माणसं भयंकर घातक असतात आणि अल्पज्ञानी तर त्यापेक्षाही घातक असतात. तसेच महावंदनेच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन धम्मा सोबतच आपल्या कुटुंबातील सुख-दुःख, मुला मुलीचे शिक्षण या विषयावर बुद्ध विहारात एकत्र आल्यावर चर्चा झाली पाहिजे. महावंदनेच्या माध्यमातून अंतकरण शुद्ध केले पाहिजे. आणि भगवान बुद्धांच्या जीवनात प्रत्येक पौर्णिमा ही महत्त्वाची असल्याचे सांगितले. यावेळी बि.डी. कांबळे, एस एस भंडारे, संभाजी पैठणे, सुनील गोदने, राघोजी वाघमारे, आनंद सोनकांबळे, भगवान जमदाडे, डि.के्. कांबळे, प्रदीप हानवते, गोविंद कांबळे, पत्रकार संभाजी सोनकांबळे यांच्यासह महिला मंडळ अनिता भोळे, अर्चना कांबळे, माया पंडित, कांताबाई गायकवाड, प्रमिला गवळी,वच्छला सोनटक्के, कमलाबाई गजभारे, ज्योती महाबळे, करुणा गर्दनमारे, वंदना भालेराव, त्रिशाला चितळे, चित्रा लांडगे, सविता कांबळे, अन्नपूर्णा सांगवीकर, संगमित्रा कांबळे, अनिताताई कांबळे, बसंती गायकवाड, वर्षा गवळी, शेषाबाई सोनकांबळे, मरुबाई सूर्यवंशी, अनुसया राक्षसे मंगलाबाई कांबळे, रमाबाई गवते, वदना बहादुरे, वनिता पंडित यांची उपस्थिती होती.

# हैद्राबाद गॅझेट लागू केल्याबद्दल ओबीसी समाजाने मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ९ सप्टेबर-**

महाराष्ट्र राज्यात विविध प्रांतात कुणबी, मराठा या नावाने संबोधण्यात येत असलेले कुणबी व मराठा एकमेकांचे नातेवाईक आहेत, तरीदेखील मराठवाड्यातील अनेकांच्या जातींचे प्रमाणपत्र मिळत नव्हते. त्यामुळे संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी हैद्राबाद गॅझेट लागू करण्याबाबत मागणीचा रेटा लावून धरला होता. त्याअनुषंगाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ उपसमिती नेमून नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली



समितीने केलेल्या शिफारशी नुसार दि.०२ सप्टेंबर २०२५ रोजी हैद्राबाद गॅझेट लागू करण्याबाबतचे शासन परीपत्रक काढले.ज्यामुळे एकच असलेला कुणबी व मराठा समाज एकच असल्याचे निश्चित होणार आहे.ज्या योगे गरजवंत मराठा समाजाच्या नागरिकांना व त्यांच्या मुलांना विविध शैक्षणिकसह इतरही सवलतीचा लाभ मिळणार असून, त्यायोगे समाजाची उन्नती होणार असल्याने,या परिपत्रकाचे स्वागत करण्यात येवून,या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढाकार घेतल्याबद्दल सकल कुणबी (ओबीसी) समाज, माहूरच्या वतीने तहसीलदार माहूर यांचे मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आलेल्या निवेदनातून त्यांच्या निर्णयाचे स्वागत, अभिनंदन करत आभार मानण्यात आले आहे.

निवेदनावर ज्ञानेश्वर चौधरी, अवधूत पाटील हडसणीकर, संतोष पाटील लेवेकर, आनंदा कलाने, अरविंद पाटील कदम,किशोर सोळंके, अमोल जाधव, हडसणीकर, पुरुषोत्तम कदम, चिंतानंद शिंदे, कुणबी मराठा महासंघ माहूर ता.सचिव राजकिरण देशमूख, विनोद वामनराव शिंदे, अर्जुन शिंदे, अरविंद शिंदे, निलेश गावंडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मोबाईलवर अश्लिल शिवीगाळ; महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ सप्टेबर-**

मोबाईलवर अश्लिल शिवीगाळ करत समाजाबद्दल आक्षेपार्ह भाषा वापरल्याप्रकरणी भारतीबाई पवार या महिलेविरुध्द विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.८ सप्टेंबर रोजी भारतीबाई पवार या महिलेने महावितरणमध्ये काम करणारे कंत्राटदार बबन दिगंबर खराणे यांना मोबाईलवर अश्लिल शिवीगाळ करत समाजाबद्दल आक्षेपार्ह भाषा वापरली. या संभाषणाची क्लिप समाज माध्यमावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत भारतीबाई पवार यांच्याविरुध्द कारवाई केली असून, बबन दिगंबर खराणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान सोशल मिडीयावरील व्हायरल होत असलेल्या ऑडिओ क्लिपची तात्काळ दाखल घेत पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, या क्लिपवरुन कुणीही अफवा पसरवू नये, शांतता राखावी, असे आवाहन जिल्हा पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आई-वडील आणि शिक्षकाने दाखवलेल्या मार्गावर चाला : राम तरटे

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ९ सप्टेबर-**

प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यात यश मिळवायचे असेल तर त्यांनी आई-वडील आणि शिक्षकांनी दाखवलेल्या मार्गावर प्रामाणिकपणे चालावे तरच यश हमखास मिळेल असा मोलाचा सल्ला पत्रकार तथा कथाकार राम तरटे यांनी दिला आहे.

बिलोली तालुक्यातील कासराळी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात आणि कथाकथनात



ते बोलत होते . आपल्या खुमदार शैलीतील कथाकथनाने त्यांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली.

कासराळी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालय शिक्षक दिनानिमित्त पत्रकार राम तरटे यांचे कथाकथन आणि विद्यार्थ्यांशी संवाद आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध विधीज्ञ विलास कुलकर्णी यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्याध्यापक संभाजी पाटील,स्मिता ठक्करवाड,पत्रकार दादाराव इंगळे,सहशिक्षक विकास कुलकर्णी कासराळीकर, सचिन सुभानकर,अश्विन फुलारी, अनिल गायकवाड, माधव लंके,वाघमारे सर, सौ.हेमा चौधरी, गंगाधर ठक्करवाड, यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधताना राम तरटे यांनी पुढे म्हणाले,आपण ग्रामीण भागातले आणि शेतकरी कष्टकऱ्यांची मुले आहोत,त्यामुळे आपल्या आई-वडिलांच्या परिश्रमाची जाणीव ठेवून अभ्यासाला लागा.आपल्या आई वडिलांच्या कष्टाला थांबवायचे असेल,त्यांना सुखाचे दिवस दाखवायचे असतील,आपल्याही आयुष्यात आनंदाचे आणि समाधानाचे क्षण आणायचे असेल तर अभ्यासाशिवाय अन्य गत्यंतर नाही असेही ते म्हणाले. शेतकरी आणि कष्टकऱ्यांना सतत नैसर्गिक आपत्ती आणि संकटांचा सामना करावा लागतो. परंतु यातूनही आपण मनावर घेतल्यास मार्ग काढता येतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी मन लावून अभ्यास करावा.दहावीनंतर बोहल्यावर चढण्यासाठी बँड वाजवण्याऐवजी स्पर्धा परीक्षेची तयारी करून त्यात यश मिळवून गावात आपल्या यशाचा बँड वाजवावा असे आवाहनही त्यांनी केले. विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधल्यानंतर आपल्या ग्रामीण भाषेतील कथाकथनाने विद्यार्थ्यांना खळखळून हसवले तर उपस्थितांची मनेही जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी सुनैना गंगाधर लंके हिने केले.